"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३

WEB SITE : http://www.nkgsbsangh.org

E-MAIL : nkgsbs@gmail.com

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। अन्नं न निन्द्यात् ।।

परस्परम् भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ

मूल्य रु. ५

क्रमांक १ वर्ष : ४४ एप्रिल – जून २०२२

BOOK PACKET

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

TO,

From : The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## श्रीगौडपादाचार्य मठ सदाशिवगड याचा जीर्णोद्धार संपन्न

सदाशिवगड येथील चिंचेवाडा भागातील श्रीगौडपादाचार्य मठ फार पुरातन आहे. ७२ वे मठाधीश श्री शिवानन्द स्वामी यांनी शके १७९३, सन १८६१ मध्ये हा मठ बांधून पूर्ण केला. मठातील मुख्य दैवत श्री शारदांबा देवी आहे. मूर्ती पंचधातूची असून रंग पांढरा आहे व उंची एक फूट आहे. जवळच खाली वेदीवर श्री चक्रांकित काळ्या पाषाणाचे लिंग आहे. या लिंगावर रुद्राभिषेक होतो तेव्हा ओंकारयुक्त सिंहनाद दीर्घकालपर्यंत होत असतो. तो दूर अंतरावर सुद्धा स्पष्ट ऐकू येतो. श्री शारदांबेची स्थापना श्रीमत् शिवानन्द सरस्वती स्वामी यांनी स्वत: केली होती. श्रीमत् शिवानन्द सरस्वती स्वामी यांनी समाधी तेथेच घेतली होती. तो पुण्य दिन शके १७९७ (सन १८६५) आश्विन वद्य अष्टमी हा होता. त्यांच्या पुण्यतिथीच्या दिनी अन्नसंतर्पणाचा कार्यक्रम असतो.

सुरुवातीला या मठाचे अर्चक म्हणून विठ्ठल भट सुखटणकर यांना सोनावडे मठातून पाचारण करण्यात आले होते. नंतर ही पूजाअर्चा वंश परंपरागत चालू होती. सहाव्या पिढीतील श्री विश्वेश्वर सीताराम सुखटणकर यांचे मार्च २०१२ मध्ये निधन झाले तेव्हा या घराण्याची सेवा परंपरा खंडित झाली. या पुरातन मठाच्या जीर्णोद्धाराची भूमीपूजा ६ जानेवारी २०२१ रोजी विद्यमान स्वामीजी श्री शिवानन्द स्वामी यांच्या शुभहस्ते झाली. जीर्णोद्धाराचा काल पूर्ण झाल्यावर समाधी पुनर्प्रतिष्ठा अनुष्ठानाचा विधी ८ एप्रिल ते १३ एप्रिल या कालावधीत स्वामीजींच्या उपस्थितीत उत्साहाने साजरा झाला त्यावेळी अनेक धार्मिक कृत्ये संपन्न झाली.

आपल्या ज्ञातीतील गेल्या पिढीतील एक कर्ते पुरुष व आपल्या एज्युकेशन सोसायटीचे आद्य संस्थापक व अध्यक्ष श्री. सदाशिवराव वाघ यांचे वडील श्री. शंकर ऊर्फ लक्ष्मण सदाशिव वाघ यांनी १८७९ मध्ये मठाच्या आवारातच समाधी घेतली होती व त्याचा संस्कृतमधील शिलालेख तेथे आहे. त्या समाधीची पूजाअर्चा वाघ वंशजामार्फत होते.

या मठाच्या जीर्णोद्धारासाठी कुणालाही विशेषत: सदाशिवगडच्या परिसरातील बांधवाना आर्थिक हातभार लावायची इच्छा असेल त्यांनी 'शिवानन्द सरस्वती स्वामी कवळे मठ सदाशिवगड' या नावे धनादेश कॅनरा बँक सदाशिवगड येथील शाखेत जमा करावा.

**SB A/c. 03092200027152** **IFSC Code CNRB0010309**

विशेष माहितीसाठी संपर्क : नीलेश बोरकर, कारवार **88617 77777**

प्रमोद गायतोंडे, मुंबई : **98330 32545**

# संपादकीय

## 'आमगेली बँक' च्या संदर्भात

**सौ. हिमांगी नाडकर्णीआपल्या बँकेच्या अध्यक्षपदी विराजमान. शंभर वर्षे पूर्ण केलेल्या तीनही सारस्वत समाजाच्या नागरी बँकांच्या इतिहासात अध्यक्षपदी विराजमान झालेल्या पहिल्या महिला.**

अलीकडेच आपल्या बँकेच्या पंचवार्षिक संचालक मंडळाची निवडणूक झाली व त्यात सौ. हिमांगी चिंतामणी नाडकर्णी (पूर्वाश्रमीच्या हिमांगी प्रेमानंद कसबेकर, कडवाड) या सर्वांत अधिक मते मिळवून निवडून आल्या. निवडणूक निकालानंतर भरलेल्या संचालक मंडळाच्या पहिल्या सभेत त्यांची एकमताने अध्यक्षपदी निवड झाली. बँकेच्या १०५ वर्षाच्या इतिहासात आपल्याच नव्हे तर शंभर वर्षे पूर्ण केलेल्या सारस्वत समाजाच्या इतर दोन नागरी बँका, शामराव विठ्ठल व सारस्वत बँक अशा तीनही बँकांच्या इतिहासामध्ये अध्यक्षपदी विराजमान झालेल्या त्या पहिल्या महिला आहेत हे कौतुकास्पद आहे. हेमांगी मॅडम या स्वत: सनदी लेखपाल (CA) असून अग्रगण्य सहकारी बँकांमध्ये त्यांना तीस वर्षांचा अनुभव आहे. त्यांनी बँकांच्या विविध खात्यांत वरिष्ठ पदे भुषविली आहेत. त्यांना Chartered Institute of Management Accountants (CIMA) यांच्यातर्फे 'MOST INFLUENTIAL CFO' पुरस्कार मिळाला होता. सर्व नागरी सहकारी बँकांत आपल्या बँकेचा क्रम दहावा आहे. हेमांगी मॅडमच्या पुढाकाराने पुढच्या काही वर्षात आपला क्रम आणखी वर जाईल अशी आशा आहे.

### आपल्या बँकेला BFSI चा पुरस्कार

Banking Financial Services and Insurance (BFSI) या संस्थेतर्फे तंत्रज्ञानातील विशेष कामगिरीबद्दल विविध क्षेत्रांत पुरस्कार दिले जातात. २०२२ साठी आपल्या बँकेला 'BEST IT ENABLED COOPERATIVE BANK' हा पुरस्कार देण्यात आला. ८ एप्रिल रोजी एका विशेष सोहळ्यात हा पुरस्कार बँकेला प्रदान करण्यात आला.

### आपल्या बँकेची सदृढता :

मागे आपल्या बँकेच्या संदर्भात अफवांचे पीक आले होते, 'आमगेली बँक साऊंड आसा मरे? काय गडबड ना मरे?' अशा प्रकारची विचारणा बऱ्याच ज्ञातिबांधवांकडून काही जाणकार मंडळींकडे केली जात असे. बँक आपली आहे म्हणून अशा किन्तूचे निराकरण करणे आपल्याच हितासाठी आहे. आपली बँक अगदी सुदृढ आहे यात शंका नाही. बँकेची तरलता (Liquidity), NPA, Capital Adequacy Ratio, Networth, इत्यादी परिमाणे रिझर्व बँकेच्या निकषांनुसारच आहेत. त्यामुळे संबंधित खातेदारांनी निश्चिंत रहावे हे आवाहन. देव बरें करूं.

द.ना.नाडकर्णी

१ एप्रिल २०२२



## दि एन्.के.जी.एस.बी. संघाच्या नव्या कार्यकारिणीची निवडणूक

### संघाच्या सभासदांना सूचना

संघाची कार्यकारिणी ही निवडून आलेले एक अध्यक्ष आणि आठ सभासद व दोन स्वीकृत सभासद अशा सभासदांची असते. संघाच्या सध्याच्या कार्यकारिणीची मुदत ३१ मार्च २०२२ रोजी संपत आहे. तेव्हा ज्या सभासदांना २०२२ ते २०२५ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी अध्यक्ष वा कार्यकारिणी सभासद म्हणून काम करायचे असेल त्यांनी संघाच्या कार्यालयातून छापील अर्ज घेऊन सूचक व अनुमोदक यांच्या सह्यांसकट अर्ज पूर्ण करून दि. ३० एप्रिल २०२२ संध्याकाळी ५ वाजेपर्यंत कार्यालयात सादर करावेत.

## मुंबई मंच व ठाणे मंच – नव्या कार्यकारिणीची निवड

मुंबई मंच व ठाणे मंच या उभय शाखांच्या कार्यकारिणीची मुदत ३१ मार्च २०२२ रोजी संपत आहे. पश्चिम व पूर्व उपनगरांत राहणाऱ्या ज्या सभासदांना २०२२ ते २०२५ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी कार्यकारिणीवर सभासद म्हणून काम करावयाचे असेल त्यांनी आपली नावे ३० एप्रिल २०२२ पर्यंत अनुक्रमे खालील ठिकाणी सादर करावीत.

**मुंबई मंच** — संघ कार्यालय, गिरगांव

**ठाणे मंच :** संपर्क – अरुण वाघ ९८२०३ ७७१०२
– सुरेश पालेकर : ९९६९४ ५५३७०

## नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशनबाबतीच्या नियमानुसार 'नार्थ कॅनरा जी.एस्.बी. वृत्तविलास' त्रैमासिकाचे प्रकटन

Form IV Rule 8

**१. प्रकाशन स्थळ :** दि नॉर्थ कॅनरा जी.एस्.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही.पी. रोड, मुंबई ४

**२. प्रकाशन अवधी :** त्रैमासिक

**३. मुद्रक, प्रकाशक आणि संपादक :** दत्तात्रय नागेश नाडकर्णी, राष्ट्रीयत्व : भारतीय

पत्ता : दि नॉर्थ कॅनरा जी.एस्.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही.पी. रोड, मुंबई ४

**४. मालक :** दि नॉर्थ कॅनरा जी.एस्.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही.पी. रोड, मुंबई ४

मी, दत्तात्रय नागेश नाडकर्णी, या निवेदनाद्वारे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

**मुंबई, १ मार्च २०२२** — **दत्तात्रय नागेश नाडकर्णी** – प्रकाशक

# प्रकाश झोत

## शतकवीर श्रीमती ताराबाई पालेकर यांचा संघ व एज्युकेशन सोसायटीतर्फे सत्कार

दोन वर्षांपूर्वी पारले येथील श्री. शंकर नीलकंठ नेत्रावळी यांनी शतकवीर होण्याचा मान मिळविला होता त्यावेळी नेहमीच्या प्रथेप्रमाणे संघ व एज्युकेशन सोसायटीतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला होता व त्यांच्याकडून आशीर्वाद घेतले होते. शंकरबाब यांच्या धाकट्या भगिनी श्रीमती ताराबाई भालचंद्र पालेकर यांनीही २० मार्च २०२२ रोजी शतकवीर होण्याचा मान मिळविला. त्याप्रसंगी संघ व एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या गिरगांव येथील निवासस्थानी जाऊन त्यांचाही सत्कार केला व आशीर्वाद घेतला.

## सौ. रूपा फेणे कुडवा यांना कर्तबगार भारतीय महिला यांच्या संदर्भातील मुलाखत मालिकेमध्ये प्रथम पाचारण

The council of foreign relations ही अमेरिकेतील विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांमार्फत समाजाचे प्रबोधन करण्याची एक प्राथितयश संस्था आहे. त्यांनी अलीकडे The women you should know in India या प्रकल्पांतर्गत भारतातील विविध नामवंत महिला तज्ज्ञांची मुलाखत घेण्याची नवी नावीन्यपूर्ण मालिका सुरू केली आहे. त्यात पहिली मुलाखत घेण्याचा मान अर्थशास्त्रातील तज्ज्ञ सौ. रूपा फेणे कुडवा यांना मिळाला आहे, हीच त्यांच्या कर्तबगारीची पावती. रूपा मॅडम पूर्वी CRISIL या प्रख्यात कंपनीच्या प्रमुख होत्या. सध्या त्या Omidyar Network India या होतकरू उद्यमींना मार्गदर्शन करून सक्षमीकरण करणाऱ्या संस्थेत कार्यरत आहेत व प्रमुख आहेत.

## श्रीमती मीरा तेलंग प्रभुवेर्लेकर यांना गोमंतक मराठी अकादमीच्या कथा स्पर्धेत द्वितीय पारितोषिक

होतकरू गोमंतक कथालेखकांना उत्तेजन मिळावे या हेतूने गोमंतक मराठी अकादमीने एक कथा स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत स्थानिक कथाकारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या असंख्य स्पर्धकांमधून श्रीमती मीरा तेलंग प्रभुवेर्लेकर यांच्या 'चकवा' या कथेला द्वितीय पारितोषिक व रोख रुपये ५००० बक्षीस मिळाले. याबद्दल त्यांचे अभिनंदन. कारवार येथील गेल्या पिढीतील एक प्रतिष्ठित व्यक्ती राव बहादूर गणपतराव तेलंग यांची मीरा ही नात. गोमंतकातील मराठी साहित्य विश्वात त्या सक्रीय असतात. वृत्तपत्रांमध्ये विविध विषयांवर लेख, आकाशवाणी व इतर व्यासपीठांवरील चर्चासत्रात सहभाग यात त्या व्यग्र असतात. आतापर्यंत त्यांचे चार लेखसंग्रह प्रकाशित झाले आहेत व मुखपत्रिकेत त्यांची दखल घेतली आहे.



## प्रो. डॉ. मेधा दुभाषी यांचे 'मायक्रो फायनान्सिंग' या विषयावरील पुस्तक प्रकाशित

नामवंत प्रशासक पद्मभूषण डॉ. पी. आर दुभाषी यांच्या कन्या डॉ. मेधा दुभाषी यासुद्धा वडिलांप्रमाणे अभ्यासू वृत्तीच्या आहेत. दिल्ली विद्यापीठातून त्यांनी एम्.कॉम्.ची पदवी मिळवली व तेथेच त्यांनी Women Intrepreneurs in Delhi या विषयावर डॉक्टरेट प्राप्त केली. सध्या त्या पुणे येथील वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ कोऑपरेटीव्ह मॅनेजमेंट या प्रतिष्ठित संस्थेमध्ये प्राध्यापक व विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. अलीकडच्या काळात 'मायक्रो फायनान्स' हा एक परवलीचा शब्दप्रयोग झाला आहे. सर्वसाधारण समज असा आहे की गरीब व्यक्तीजवळ आवश्यक ती आर्थिक पत नसते व त्यामुळे त्यांच्याशी व्यवहार करणे बँकेच्या साच्यात बसत नाही. पण अल्पबचतीच्या स्वयंपूर्ण गटाच्या माध्यमातून बँकेतर्फे कर्ज घेऊन लघुउद्योगामार्फत नफा मिळवता येतो. याच संकल्पनेतून डॉ. दुभाषी यांनी 'मायक्रो फायनान्स' या विषयावर सर्वसामान्य वाचकांना आकलन होईल अशा पद्धतीचे एक पुस्तक प्रकाशित केले आहे. विद्यार्थी, अध्यापक, व्यावसायिक यांना हे पुस्तक त्यातील सहजसुलभ भाषेतून केलेल्या विवेचनामुळे संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोगी होण्यासारखे आहे.

## सौर ऊर्जा निर्माण क्षेत्रातील तज्ज्ञ श्री. अक्षय बोरकर यांना 'इंडियन अॅचीव्हर्स अॅवॉर्ड'

पूर्वी वांद्रे येते राहणारे श्री. भवानीशंकर ऊर्फ राया बोरकर यांचा कर्तबगार नातू श्री. अक्षय प्रद्योत बोरकर यांनी सौर ऊर्जा निर्माण क्षेत्रात नेत्रदीपक यश मिळविले आहे. ते 7 Green Solar Systems Pvt Ltd या कंपनीचे संस्थापक व कार्यकारी संचालक आहेत. सूर्यप्रकाशावरून ऊर्जा निर्माण करणाऱ्या 20 MW पेक्षाही अधिक क्षमतेचे प्रकल्प ते यशस्वीपणे उभारतात. टाटा स्टील, रेमण्डस, लार्सन अँड टोब्रो अशा नामांकित कंपन्यांसाठी त्यांनी ऊर्जा प्रकल्प साकार केले आहेत. सामाजिक कार्याच्या जाणीवेतून त्यांनी सौर ऊर्जेवर चालणारे पदपथावरील हजारो दिवे लावले आहेत. तीन वर्षांपूर्वी 'झी युवा' वाहिनीतर्फे श्री. बोरकर यांना सर्वोत्कृष्ट नवोदित उद्योजक म्हणून पुरस्कार मिळाला होता व तेव्हा ज्ञातीच्या वार्षिक स्नेहसंमेलनात त्यांचा जाहीर सत्कारही करण्यात आला होता. 'इंडियन अॅचीव्हर्स फोरम' या संस्थेतर्फे प्रतिवर्षी विविध क्षेत्रांतील व्यक्तींना 'इंडियन अॅचीव्हर्स अॅवॉर्ड' हा पुरस्कार देण्यात येतो. २०२१–२०२२ सालचा हा पुरस्कार श्री. बोरकर यांना त्यांच्या व्यवसायातील योगदानाबद्दल व राष्ट्र उभारणीच्या कार्यात हातभार लावल्याबद्दल प्रदान करण्यात आला. श्री. बोरकर यांचे हार्दिक अभिनंदन.

## ठाणे मंच रौप्य महोत्सवी सांगता सोहळा

रविवार दि. २० मार्च २०२२ अखेर उजाडला. करोनाचे अनेक भयंकर अडथळे ओलांडून शेवटी ठाणे मंचाचा रौप्य महोत्सव साजरा केल्याची सुसंधी ठाणे मंच कार्यकर्त्यांना मिळाली.

खूप धडपड व मेहनत घेऊन संपूर्ण समारंभाचे नियोजन योग्य पद्धतीने तयार करून ठाणे मंचाचे कार्यकर्ते ते पार पाडण्यास सिद्ध झाले. स्थळ ठरले राजा शिवाजी विद्यालय, बी.एन. वैद्य सभागृह, दादर.

दोन बसेस, एक ठाण्यावरून व दुसरी जोगेश्वरीहून ठीक ८.३० वाजता निघाल्या आणि सभागृहाजवळ १० वाजण्याच्या सुमारास पोहोचल्या.

बसमधून उतरलेल्या प्रत्येकाने आपले नांव नोंदवहीत नमूद करून रौप्यमहोत्सवानिमित्त मिळालेली स्मरणभेट (कॉफी मग) घेऊन ते उपहार कक्षाकडे निघाले.

गरमागरम उपमा इडली चटणी, सांबार, चहा/कॉफी घेऊन आणि श्रमपरिहार करून अतिशय उत्साहाने गारेगार सभागृहात एकत्र जमले. सारेजण एकमेकांना हसतमुखाने, अपुर्बायेने भेटत होते. वातावरणात समारंभाचा उत्साह व आनंद ओसंडत होता. व्यासपीठावर सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यासाठी सूत्रसंचालक श्री. दिनेश नाडकर्णी व श्री. सुरेश पालेकर हजर होते.

कार्यक्रमाची सुरुवात कु. निधी देसाई यांच्या उत्कृष्ट सरस्वती वंदना आणि गणेश वंदना या नृत्याने झाली. सन्माननीय आमंत्रित श्री. सुनील गायतोंडे (माजी उपाध्यक्ष **NKGSB Bank**) व डॉ. सतीश वाघ (आपल्या समाजातील यशस्वी उद्योजक) काही वैयक्तिक कारणामुळे अनुपस्थित होते. ठाणे मंचाने त्यांची अनुपस्थिती उल्लेखित केली. आपल्या ज्ञातीतील मान्यवर, मुखपत्रिकाकार श्री. द. ना. नाडकर्णी व दानशूर श्री. अरुण कसबेकर – मुख्य अतिथी आणि एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष श्री. देवदास नाडकर्णी यांना मंचावर येण्याची विनंती करण्यात आली. मान्यवर मंचावर उपस्थित झाल्यावर दीप प्रज्वलन झाले.

संघाचे कार्याध्यक्ष श्री. मारुती दळवी यांनी ठाणे मंचाच्या २५ वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेतला. त्यानंतर ठाणे मंचाचे कार्यक्षम पदाधिकारी श्री. गिरीष रेगे यांनी ठाणे मंचच्या स्थापनेपासून कार्यपरिचय करून दिला. मंचाने अतिशय पारदर्शीपणे केलेले उपक्रम कथन केले. या वाटचालीत निरलसपणे मदत करणाऱ्या साऱ्या कार्यकर्त्यांचे नामोल्लेख करून त्यांचे ऋणनिर्देश केले. अनेक उद्दिष्टे ठरवून त्यांचे सफल नियोजन केल्याबद्दल संबंधितांचे आभार मानले.

एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष श्री. देवदास नाडकर्णी यांनी आपल्या भाषणात सांगितले, ठाणे मंचाने प्रत्येक उपक्रम यशस्वी केले. २५ वर्षांत त्यांनी मागे वळून पाहिलेच नाही असे नमूद केले.



श्री. अरुण कसबेकर यांनी गानकोकिळा लता मंगेशकरांबद्दल काही हृद्य आठवणी सांगितल्या. श्रीमती नीलिमा नाडकर्णी यांनी ऑगस्ट १९९६ साली ठाणे मंचाचे इवलेशे रोपटे लावले होते. आज त्याचा वटवृक्ष झाला. ह्या दोन्ही कार्यक्रमांस मी हजर होते असे सांगितले.

स्मरणिकेचे संपादक श्री. सुरेश पालेकर यांनी वेगवेगळ्या लेखकांकडून लेख कसे लिहून घेतले हे हसत, हसवत, खुमासदार शैलीत सांगितले. स्मरणिकेसाठी विशेष कष्ट घेतलेल्या तेंडूलकर, गिरीष रेगे, राजेश दिवेकर यांचा विशेष उल्लेख केला. स्मरणिका वाचल्यानंतर आपले बरे वाईट मत आम्हास कळवा असे आवाहन केले.

**NKGSB** बँकेच्या पहिल्या महिला अध्यक्षा श्रीमती हेमांगी नाडकर्णी आमच्या आमंत्रणास मान देऊन हजर होत्या. त्यांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन झाले. आपल्या भाषणात श्रीमती नाडकर्णी यांनी बँकेचे ध्येय, वाटचाल आणि पुढील उपक्रमाबद्दल माहिती दिली. लोकांनी ठेवीत पैसे गुंतवून बँकेस सहकार्य करावे असे आवाहन केले.

त्यानंतर ठाणे मंचाच्या विविध उपक्रमांसाठी कार्य केलेल्या सर्वांचा स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

शेवटी श्री. राजेश दिवेकर यांनी आभार प्रदर्शन केले आणि पहिले सत्र समाप्त झाले. त्यानंतर अतिशय जिव्हाळ्याचा कार्यक्रम म्हणजे स्नेहभोजन. अतिशय चविष्ट व विविध खाद्य पदार्थ ठेवले होते. सर्वजण जेवणाची वाखाणणी करीत चवीचवीने भोजनाचा आस्वाद घेत होते. अशा प्रकारे कार्यक्रमाचे मध्यांतर झाले.

दुसऱ्या सत्राची सुरुवात काही तांत्रिक कारणामुळे तासभर उशिरा झाली. श्रीमती लता नायर यांच्या निवेदनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. श्री. प्रभात व श्रीमती प्रिया कुलकर्णी यांच्या गणेश वंदना गाण्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर विघ्नेश पिकळे, तेजश्री कुलकर्णी, प्रज्ञा वागळे (चुनाभट्टी), दुर्वा वागळे यांनी आपली गायन कला सादर केली.

विजय वागळे यांनी शिट्टीवर गाणी म्हटली, विदुला कामत, पराग थळी यांनी एका पाठोपाठ एक सुंदर गाणी सादर केली.

रेयांश शिंग्रे यांनी **Zambe** वाद्य वाजवले व शिवाजींचा पोवाडा म्हटला. आर्या वर्टी या १३ वर्षीय बालिकेने 'ती फुलराणी'मधील एक प्रवेश सादर केला. अनन्या नायक या छोट्या मुलीने संस्कृत श्लोक सादर केले. सान्वी थळी हिने ''शहंशहा' सिनेमातील गीतांवर नृत्य सादर केले. श्रीमती लता नायर यांनी सुश्राव्य कोकणी गीत सादर केले. श्रीमती ज्योती सुखटणकर यांनी भैरवी गाऊन कार्यक्रमाची सांगता केली.

शेवटी जनगणमन ह्या राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. त्यानंतर सर्व उपस्थित मंडळींनी चहापान करून ते ठाणे मंचाचे गुणगान गात मार्गस्थ झाले.

सुरेखा पालेकर – ठाणे सुवर्णा कुर्डेकर (वर्टी) ठाणे

## एक हसरे प्रसन्न व्यक्तिमत्व
## आमचे मेहुणे डॉ. सदानंद नाडकर्णी

कित्येक माणसाच्या मनाचा थांगपत्ता कोणालाच लागत नाही. कबिराने अनेक रंगीत धागे जोडून शेला विणला. आपलंही मन असंच असावं. प्रत्येक धागा म्हणजे आठवणींचा, अनुभवाचा, आनंदाचा. दु:खाचा अन् सुखाचाही असतो.

काल जानेवारी २२ ची 'मुखपत्रिका' मिळाली अन् मी चवीचवीने वाचण्यात गुंग झाले. अनेक आप्तजनांचे 'वाढदिवस' प्रत्येक महिन्यात येतात. आपण ते आनंदाने, उत्साहाने साजरे करतो. मला 'मे' महिना आठवतो. १ मे ला माझ्या नातवाचा ॲड. करण कदम अन् १९ मे ला माझ्या कन्येचा ॲड. सौ. मृदुला रवी कदम हिचा वाढदिवस येतो. या दोन तारखांच्या दरम्यान एका प्रिय व्यक्तीचा वाढदिवस येतो. ३ मे आठवणीत रहाण्याजोगा दिवस. आमचे 'भावोजी' डॉ. सदा नाडकर्णी यांचा येतो ९० वा वाढदिवस. भावोजी म्हणजे एक उमेदी, हसरे, निरागस आणि साधे व्यक्तिमत्व. यंदा २२ साली ३ मे ला त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने असं म्हणावंसं वाटतं की 'जणू सोनियाचा दिन.'

त्यांच्या नावातच सदानंद आहे. नावाप्रमाणे सदा प्रफुल्लीत अन् टवटवीत. भावोजी हे माझ्या सख्ख्या चुलत बहीण सौ. सुहासचे यजमान. यांच्या नावातही हास्य आणि चैतन्य ओसंडून वाहाते. दोघं एकमेकांना अनुरूप आहेत. त्यांच्या वैद्यकीय व्यवसायाबद्दल, ज्ञानाबद्दल किंवा अनुभवाबद्दल मला काही लिहायचे नाही कारण त्यांचे 'माझं प्रिस्क्रीप्शन' या पुस्तकातून व्यक्त झाले आहे. त्यांचे अनेक विद्यार्थी वैद्यकीय क्षेत्रात जगभर चमकले आहेत. त्यांची कन्या, पुत्र, जावई सगळेच डॉक्टर आहेत हे सर्वांना परिचित आहे. एक 'व्यक्ती' म्हणून माझ्या अल्पमतीप्रमाणे लिहीणार आहे.

मी त्यांना सुहासच्या विवाहापासून ओळखते. मी जरी लोणावळ्याला होते, तरी 'फोन' हा आमचा दुवा आहे. कारण फोन त्यांच्या जवळच असतो व तेच फोन उचलतात. मी दहीसर इथे 'अशोकवनात' राहते. एकदा ते सुहासबरोबर आले होते. चप्पल काढताच प्रथम प्रत्येक खोलीभर फिरले अन् कौतुकाने माझ्या पाठीवर थाप मारून हसत म्हणाली की तू Flat (फ्लॅट) फार छान ठेवला आहेस. मला खूप आनंद झाला.

असाच एक सुखद प्रसंग आठवतो. त्यांच्या पुस्तकाच्या प्रकाशनाचा सोहळा होता. हॉल खचाखच भरला होता. अनेक त्यांच्याबद्दल भरभरून बोलले. सगळे डॉक्टर्स असल्यामुळे मनात असूनही बोलता आले नाही. आणि म्हणूनच त्यांच्याबद्दल लिहावे असे वाटले. कार्यक्रम संपल्यावर त्यांना 'बुके' दिला. आणि खूप आवडतात म्हणून



'पुरणपोळ्या' घेऊन गेले होते. ते त्यांच्या कन्येकडे, डॉ. सौ. संगीताकडे दिले. पण घरी जाताना कन्येला म्हणाले, 'पुरणपोळ्याचं पाकीट दे. माझ्यासाठी कुंदाने खास आणल्या आहेत. घरी गेल्यावर लगेच खाईन.' किती साधा आणि निरागसपणा! माझ्या नातवाच्या विवाहाला आणि माझ्या वयाच्या पंचाहत्तरीला वेळात वेळ काढून माझ्या कन्येकडे नेपियन सी रोडला आले होते. त्यांच्याबद्दल लिहिण्यासारखं खूप खूप आहे. पण 'मुखपत्रिके'च्या पृष्ठांना काही मर्यादा आहेतच की!

तुमच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त
फक्त तुमच्यासाठी
काही नाती ही जिव्हाळ्याने फुलतात
अन् सहवासानं उमलतात.
आपलं ही नातं ही असंच
पहाता पहाता अनोळखी नात्याचं
भावोजीच्या नात्यात रूपांतर झालं.
अन् हे नातं अधिक घट्ट झालं
आज ९० व्या वाढदिवसाचा प्रसन्न दिवस
तुमच्या सुखी, समाधानी, प्रसन्न जीवनांसाठी
मनोभावे श्री मंगेशाची प्रार्थना करण्याचा
सदिच्छा व्यक्त करण्याचा
तुमच्या भावी जीवनात
येणारा प्रत्येक क्षण
आनंदी, उत्साहाचा असावा
साऱ्या मनोकामनांची पूर्ती व्हावी
आमच्या नाडकर्णी कुटुंबाच्या शुभेच्छा
असतील फक्त तुमच्यासाठी 'भावोजी'

**–कुंदा र. देसाई**
**९८१९०५२३१९**

## डी एन नाडकर्णी नाबाद ८५
## एक आगळे वेगळे समर्पित व्यक्तिमत्त्व

'कोंकणी आसा आमगेली मायबोली' असे आपण अभिमानाने म्हणतो. पण आज अनेक शहरांत जी.एस.बी. लोक इंग्रजी बोलतात. असे दिसून येते की या भाषेचे भूत अजूनही आमच्या मानगुटीवर बसले आहे. 'आमगेल्या' कोंकणी भाषा म्हणजे अरेतुरेची भाषा. आमच्या कोंकणी भाषेत 'एकेरी' संबोधनाचा गोडवा आहे. मला माझ्या भाषेचा नितांत अभिमान आहे. म्हणूनच ज्या व्यक्तीबद्दल लेख लिहिणार आहे ती व्यक्ती म्हणजे 'मुखपत्रिके'चे संपादक मा. श्री. दत्तात्रय नाडकर्णी होय. पण त्याला डी. एन्. नावानेच प्रामुख्याने ओळखतात.

गेली अनेक वर्षे माझे अनेक लेख मुखपत्रिकेत प्रकाशित झाले आहेत. माझे वास्तव्य मुंबईपासून दूर म्हणजे लोणावळ्यात होते. त्यामुळे तीन-चार वेळा डी.एन्.शी प्रत्यक्षात भेट झाली असावी अन् काही कामानिमित्त फोनाफोनी होते.

जानेवारी २०२२ मध्ये त्याचा ८५ वा वाढदिवस साजरा झाला. नेहमीप्रमाणे त्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. बस्स! पण यावेळी माझ्या मनात आले की या 'विश्वकोषा'बद्दल थोडं तरी लिहावंच लागेल. पण काही अडचणीमुळे तो लेख पाठवता आला नाही. अन् म्हणूनच मी मुखपत्रिकेत लेख पाठवायचे नक्की केले. मी त्याला 'विश्वकोष' म्हणते कारण मला फक्त माझ्या सासरचा, माहेरचा अन् माझे पती सुधाकर देसाईंच्या मित्रमंडळींचा परिचय आहे. पण मी डी.एन्.ला फोन करते तेव्हा त्याला जी.एस्.बी. प्रत्येक कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीची माहिती मुखोद्गत असते. माझा लेख आवडलेली व्यक्ती फोन करते तेव्हा एकाद्या अपरिचित व्यक्तीबद्दल इत्थंभूत माहिती त्याच्याकडून कळते तेव्हा मला नवल वाटते.

मला आवर्जून लिहावेसे वाटते की ही व्यक्ती इतक्या आत्मीयतेने, जिव्हाळ्याने, तळमळीने अन् सातत्याने मुखपत्रिकेचे संपादक म्हणून काम करते तेही अनेक वर्षे कसलाही कंटाळा न करता आपुलकीने आपलं संपूर्ण जीवन मुखपत्रिकेला अर्पण केले आहे. त्यासाठी स्वत:ची आत्मप्रौढी नाही की कसलाही गाजावाजा नाही.

घर संसारासोबत कर्तव्य बजावताना सौ. शरयूवैनींही तितक्याच सहकार्य करतात.

आजपर्यंत मी अनेक अंकांतून लेखन केले. अनेक संपादकांचा परिचय झाला. पण मैत्री जमली ती डी.एन्.शी. असं म्हणतात की आभाळ पेलण्याची ताकद मैत्रीत असते स्नेहाच्या नात्याचे बंध रक्ताच्या नात्याइतकेच दृढ असतात असे म्हणतात. काही व्यक्ती अचानक आपल्या जीवनात येतात अन् आपल्याला नवीन 'ऊर्जा' मिळते. माझ्या बाबतीत तसंच घडलं. माझ्या मनात त्याच्या कार्याची महानता माझ्या लेखातून व्यक्त केल्या. लेख प्रकाशित करण्याबाबत फोन केला तो म्हणाला, 'कुंदा, मी मुखपत्रिकेचा संपादक आहे. माझ्याबद्दल यापूर्वी लिहिलेले आहे.' तरी मी बालहट्ट धरला तेव्हा मोठ्या मिन्नतवारीने तयार झाला. मला समाधान मिळणार आहे.



हळुवार बहरणारी, मनाला भावणारी, मनसोक्त आनंद देणारी एकच गोष्ट म्हणजे त्याचा वाढदिवस. त्याच्या जीवनातील प्रवासाचा दीर्घ टप्पा म्हणजे अमृतोत्सव होय. एक अमृतानुभव. आपल्याकडे पूर्वपार चालत चालत आलेली प्रथा म्हणजे ८० ते ८५ पर्यंतचा 'सहस्रचंद्रदर्शन योग' असे म्हणतात. याचाच अर्थ असा की व्यक्तीकडे अनुभवांचा खूप मोठा साठा आहे. अन् हे भाग्य डी. एन्. ला लाभले आहे. आणि मला ही त्याच्याकडून खूप काही शिकता आले. याक्षणी मनात एकच सदिच्छा आहे की डी. एन्.च्या या श्रमसाफल्याचा लाभ आपल्या बाबतीतील बांधवांना मिळावा. अन् त्याच्याही आशाआकांक्षांची पूर्वी सफल व्हावी अन् 'मुखपत्रिके'ची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी असेच महान कार्य श्रीमंगेशाच्या वरदहस्ताने घडो हीच सदिच्छा.

डी. एन्.च्या सहस्रचंद्रदर्शन योगाच्या निमित्ताने माझ्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी हा लेख लिहिण्याचा उद्देश आहे.

।।श्री गणेशायनम: ।।

**– कुंदा र. देसाई : ९८१९०५२३१९**



### श्रद्धांजली



**श्री सदानंद शिवराज वागळे**
देवाज्ञा २३-०४-१९९५

**श्रीमती कमला सदानंद वागळे**
देवाज्ञा १०-०६-२०१६

आईबाबारूपी वटवृक्षाची घरास मिळे छाया ।
तुमच्या नयनी नित्य आढळे आमच्यावरची माया ।।
शिकवण तुमची बहुमोलाची कधी ना गेली वाया ।
तुमचे हे उपकार जीवनी कधी नको विसराया ।।
ठाम उभे तुम्ही आमच्या पाठी उभा जणू गणराया ।
आईबाबा वटवृक्षाला रोज पडावे पाया ।।

**– विजय सदानंद वागळे – ९२२१६०७५७७**

## *Celebrating*

# 1922 100 2022

### *Smt. Tarabai Bhalchandra Palekar*

आजी,
तुझी ती प्रेमळ हाक, तुझ्या पदराची सावली,
कुणाचा नाही धाक, तूचि आमची माउली!
कितीही मोठे झाल्ये तरी, तुला विसरू शकत नाही
आजी, तुझ्या सारखी ह्या जगात दुसरी कोणी असूच शकत नाही!
आजचा दिवस आम्हा सर्वांसाठी खूप खास आहे,
तुला उदंड आयुष्य लाभो, मनी हाच ध्यास आहे!
तुझ्या सोबत घालवलेल्या क्षणांचा आमच्या आठवणीत आहे ठेवा,
तुझ्या प्रेमाचा आणि आशीर्वादांचा वर्षाव आम्हाला सदैव आहे हवा!
झालीस तू शतायुषी, व्हावीस तू दीर्घायुषी, हीच आमची इच्छा
शतकोत्तर निरामय आयुष्यासाठी खूप खूप शुभेच्छा!!
शुभं भवतु!!

– नातवंडांकडून

**100 Years of loving and living, caring and giving, learning and teaching,**
**'Forever young at heart, with her beliefs and outlook generations apart,**
**Always ready to play a part; be it a wife, a sister,**
**a mother, a grandmother or a great grandmother**
**Those moments wouldn't have been perfected by none other!**
**Always ready to cook and feed, she has helped many in need.**
**She is our pillar, the backbone of our family,**
**We look up to her and wish to be like her eventually.**
**Her love, her smile, her warmth has been our driving force,**
**God's blessings have always been her energy source.**
**She has raised us with all her love and grit,**
**from her we have learned never to quit!**
**She has lived her life with dignity, her life has been exemplary,**
**God has given us this opportunity to celebrate her centenary.**
**We wish to celebrate this milestone together, but the time is challenging,**
**So as a token of love, we share with you her Blessing!**

***- Palekar Family Members***




MSIPL **MANGSIDESH INVESTMENTS PVT LTD**

402, Business Point, Paliram Road, Off S.V.Road, Behind Brahma Kumari Hospital,
Andheri (West), Mumbai 400 058
Tel No. 022-4233 2323/ 6584 1233/ 6523 8964/ 98337 22444




*A little every month grows to something significant over time!!!*

*Invest Rs.1000/ - Per month & get...*

| Investment Years | Total Investment | Growth Rate 8% | Growth Rate 12% | Growth Rate 15% |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 276,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |




*Indian Equity market has given avage 16% return s in last 32 year s...*

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully before investing.

## प्रतिक्रिया

### दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघ, ठाणे मंच

### रौप्य महोत्सवी वर्ष १९९६-२०२१ स्मरणिकेवर एक प्रतिक्रिया

वरील स्मरणिका हातात पडताच मला ''किशोरकुमार'' या यशस्वी कलाकाराची आठवण झाली.

१) दूर गगन की छाँव में (१९६४), २) बढती का नाम दाढी (१९७४), ३) शाबास डॅडी (१९७९), ४) चलती का नाम जिंदगी (१९८२) आणि अनेक! या सर्व सिनेमांमध्ये निर्माता-किशोरकुमार, दिग्दर्शक-किशोरकुमार, संगीत दिग्दर्शक-किशोरकुमार, संकलन व इतर विभाग सांभाळणारे सुद्धा एकमेव सर्वेसर्वा-किशोरकुमार.

ही रौप्यमहोत्सवी स्मरणिकाही हेच सांगत आहे की, १९९६ मध्ये ठाणे मंचाची स्थापना झाली त्यातील एक महत्त्वाचा घटक - श्री. सुरेश पालेकर.

अतिशय सोयीस्कर, स्वस्त, मजेशीर, आपल्या अनेक अनोळखी ज्ञातिबांधवांची भेट घडविणाऱ्या सहली आयोजित करण्यापासून त्या अगदी निष्ठेने यशस्वी, आनंददायीरीत्या पूर्ण करण्यापर्यंत स्वत:चे मानसिक, शारीरिक श्रम अगदी १००% ओतणाऱ्या गृहस्थाचे नाव - श्री. सुरेश पालेकर.

थोडक्यात, कुठलेही समाज कार्य हातात घेतले व ते कितीही मामुली असले तरी त्यांच्या अगदी मुळाशी जाऊन, स्वत: विचार करून, तसेच इतरांशी विचारविनिमय करून, सर्व प्रकारे व सर्व तऱ्हेने त्याचा पूर्ण अभ्यास करून, त्या कार्याची रूपरेखा - Line of action - तयार करणारे सर्वेसर्वा - श्री. सुरेश पालेकर.

थोडक्यात चिकाटी आणि सखोल अभ्यास हे दोन्हीही गुण किशोरकुमारांनी केवळ स्वत:च्या भल्याकरिता वापरले आणि पालेकरांनी आपल्या ज्ञातिबांधवांच्या!

**- सौ. मंगला (प्रभा) अरुण कसबेकर**

### ☺ ☺ ☺ विजूले चुटकुले ☺ ☺ ☺

कमळी घोवाक : तो आमगेल्या बाजून राबतलो नागेश बायलेले कितले कवतूक करता. तिगेल्या वाढदिवसाक तो फुलाचो सडो घालता आणि तिका ताजेर बसयता आणि तुमी?

घोव : हे पळय तू वोगीच वाद घालनाका नागेशालो धंदो फुलाचो, मजो धंदा मिरसांगेचो. हांवे मिरमांग पसरायल्यार तूं थंय बसच्याक तयार आसा?

- विजय सदानंद वागळे,ठाणे-९२२१६०७५७७



## लता मंगेशकर

### एक विलक्षण चुटपुट लावणारी आठवण!



चर्चगेटच्या सी.सी.आय. (CCI) या आलिशान क्लबचे, न भूतो न भविष्यति, असे चेअरमन कै. श्री. राजसिंग डुंगरपूर, आमचे फार जवळचे स्नेही होते आणि सर्वांना हे ज्ञातही आहे की, भारतरत्न गान-कोकिळा लता मंगेशकर दीदींच्या अगदी गळ्यातले ताईत होते. दोघांचे एकमेकांवर अतिशय प्रेम होते. मी या लेखात त्यांच्या प्रेमाची महती लिहिण्याचा प्रयत्न करीत नाही. फक्त एवढेच सांगू इच्छितो की, जेव्हा राजभाईंच्या-राजघराण्यांतून त्यांच्या विवाहास विरोध दर्शविला गेला तेव्हा दोघांनीही, कोणालाही न दुखवता, आजन्म अविवाहित राहण्याचा संकल्प केला व तो शेवटपर्यंत पाळला.

आज डुंगरपूर राजघराणे एका भारतरत्न, जगज्जेत्या स्वरसम्राज्ञीला, आपल्या कुटुंबाचा एक अविभाज्य हिस्सा करण्याची, परमेश्वराची दिलेली संधी, केवळ स्वकर्माने हुकल्याबद्दल खूपच पस्तावली असतील. वीस, बावीस वर्षांपूर्वी, माझ्या पत्नीच्या दोनही गुडघ्यांचे व माझ्या एका गुडघ्याचे ऑपरेशन झाले होते. आणि आम्ही त्या आजारातून अगदी खडखडीत बरे झालो होतो. राजसिंग म्हणाले-''मिठूला-I mean-लताला पण हा गुडघ्यांचा त्रास आहे! पण ती ऑपरेशनला घाबरते तेव्हा तुम्ही दोघांनी तिला जर नीट समजाविले तर कदाचित ती ऑपरेशनला तयार होईल.

आम्हा दोघांची, राजभाईंनी पुढील आठवड्यातील 'प्रभुकुंज' मध्ये भेटीची वेळ सुद्धा नक्की केली होती. पण काही कारणास्तव ती भेट होऊ शकली नाही. आणि परत तो विषय आला नाही. हीच ती एक विलक्षण चुटपुट लावणारी आठवण.

लतादीदींची अंत्ययात्रा जगातील कोणत्याही थोर पुढाऱ्याच्या अंत्ययात्रेपेक्षा जरा सरसच वाटत होती. बहुतेक नावाजलेल्या लोकांच्या अंत्ययात्रेत, केवळ नटनट्यांचे तसेच आपल्या आवडत्या इतर महान व्यक्तींचे दर्शन घेण्याच्या उद्देशाने येणारे लोक बरेच असतात पण इथे फक्त आणि फक्त आपल्या आवडत्या लतादीदींचे दर्शन व्हावे केवळ याच उद्देशाने, शोकाकुल अवस्थेत पुरा जनसमुदाय तळमळत होता, व्याकूळ झाला होता व बऱ्याच नावाजलेल्या नटनट्यांकडे, समोर स्पष्ट दिसत असूनही, दुर्लक्ष झाले.

जगातील करोडो लोक, तासंतास, अगदी प्राण डोळ्यात आणून, व्याकूळ मनाने, पाणावलेल्या डोळ्यांनी टीव्हीसमोर बसलेले माझ्या आयुष्यात तरी घडलेले मी आधी कधी पाहिले नाही.

मी तर असे म्हणेन ही अंत्ययात्रा केवळ लोकांच्या अपार संख्येमुळेच नव्हे तर प्रत्येक यात्रीच्या -परत सांगतो-प्रत्येक यात्रीच्या मनातील लतादीदींबद्दल अपार प्रेम आणि कायमच्या ताटातुटीची खंत पाहता, ही अंत्ययात्रा जगातील नववे आश्चर्यच ठरेल.

आता एक पर्व संपले आणि स्मारकांची तयारी, योजना संकल्प सुरू झाले.
जेथे शिवाजी पार्कवर रविवारी ६ फेब्रुवारी २०२२ ला अंत्यसंस्कार झाले तेथेच लतादीदींचे स्मारक उभारण्याची काही लोकांनी मागणी केली आहे. तर काही जणांनी ''शिवाजी पार्कची स्मशानभूमी करू नका'' असा आग्रहही धरला आहे.

दीदींची अंत्ययात्रा टीव्हीवर पाहताना एकाने सहज प्रश्न केला-लतादीदींचे शिक्षण कुठपर्यंत झाले होते? मी त्याच्या मानगुटीला पकडून सांगितले की, लतादीदींनी ''संगीत स्वरांमध्ये'' अतिशय उच्च पातळीवर P.Hd. केले आहे. परंतु या जगात लतादीदींच्या स्वरांची पातळी ठरविण्याच्या लायकीचे उच्च कोटीचे P.Hd. परीक्षकच नाहीत. लतादीदींचा परमभक्त सचिन तेंडुलकरनेही आपल्या दीदींचा कित्ता गिरवून क्रिकेटमध्ये सुपर P.Hd. केले आहे व जगात आपल्या आवडत्या विषयात अनेक विक्रम प्रस्थापित केले आहेत.

त्याचवेळी माझ्या मनात एक कल्पना तरळली की शिवाजी पार्कला लतादीदींचे निर्जीव स्मारक करण्याऐवजी शासनाने महाराष्ट्र किंवा गोव्यामध्ये एक दोन गावे दत्तक घ्यावीत व मंगेशकर कुटुंबीयांच्या पुढाकाराने तसेच श्री. डी. वाय. पाटील सारख्या अनुभवी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन अगदी काटेकोरपणे जगातील एक अद्वितीय असे भव्य "LATA MANGESHKAR INTERNATIONAL MUSIC UNIVERSITY" (लता मंगेशकर आंतर्देशीय संगीत विद्यापीठ)ची मुहूर्तमेढ रचावी. लताजींचा ''गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस्'' मध्ये जगात जास्तीत जास्त गाणी ध्वनीमुद्रित केल्याचा विक्रम तर आहेच शिवाय त्यांनी एकूण ३६ विविध आंतर्देशीय भाषेतून गाणी ध्वनिमुद्रित केल्याचाही विक्रम आहे. माझे अगदी प्रांजल मत आहे की या विद्यापीठातून या ३६ भाषांपैकी जास्तीत जास्त भाषेत, संगीतामध्ये विद्यार्थ्यांना पदवी घेता आली पाहिजे. तसेच भारतीय जुने/नवे संगीत चिरकाल टिकवून ठेवण्याचीही या विद्यापीठात अगदी अद्ययावत तंत्राची (Modern Technology) सोय झाली पाहिजे.

या पेक्षा भारतरत्न लतादीदींचे चिरकाल, सतत स्वरगुंजन होत असलेले योग्य स्मारक कुठले होऊ शकेल? भव्य संगीत विद्यापीठच लतादीदींना दिलेली आंतर्देशीय श्रद्धांजलीच ठरेल!

**-अरुण भास्कर कसबेकर - ९८२०२९१३६५ / ८७७९९८६६०६**



## 'सर्वप्रथम सेवा' याची व्याप्ती

मुंबईमध्ये हजारो हौसिंग सोसायट्या, टॉवर्स, इंडस्ट्रीयल इस्टेटस् वगैरे आहेत. त्यांचे व्यवस्थापन म्हणजे एक डोकेदुखी व मनस्ताप असतो. भाडी गोळा करणे, बँकेत भरणा करणे, पाणी/वीज/प्रॉपर्टी टॅक्स यांची बिले भरणे, माळी, सुरक्षा, लिफ्टमन यांच्यावर देखरेख ठेवणे, दुरुस्ती देखभाल करणे, हिशेब ठेवणे अशी अनेक कामे असतात. कार्यकारिणीचे सभासद म्हणून कुणाला राहायचे नसते, जे मारून मुटकून सभासद होतात त्यांना वेळ नसतो. आम्ही ही सगळी ए टू झेड कामे करण्याची जबाबदारी घेतो. आमच्याजवळ सध्या अनेक संस्थांची कामे आहेत. त्यांत टाटा हाऊसिंग, लक्ष्मी इंडस्ट्रीयलसारख्या मातब्बर संस्था आहेत. त्याशिवाय लघु उद्योग सुरू करण्यासाठी आमच्याजवळ नोंदविलेले अनेक ट्रेड मार्क्स आहेत.

**उद्दिष्ट :** सेवा पुरविण्यासाठी आम्हाला मनुष्यबळाची आवश्यकता आहे. इच्छुक ज्ञाति बांधवानी आमच्याशी संपर्क साधावा. त्यांना अर्थार्जन करण्यासाठी आम्ही साहाय्य करू तसेच आमच्या ट्रेड मार्क्सच्याद्वारे व्यवसाय सुरू करण्यासाठी आम्ही मार्गदर्शन करू. ज्ञातिबांधवांची सेवा हेही आमचे उद्दिष्ट आहे.

**संपर्क : न. अ. जोशी : ९८१९३०४५९९/९९२०४०४५९९**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** पोस्ट बॉक्स ११९९०, आझादनगर पोस्ट ऑफीस,
अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५३.

SERVICE FIRST®

SOCIETY SERVICE RESOURCE
समाजसेवा समृद्धि

98193 04599 | 99204 04599

सर्वप्रथम सेवा®
SOCIETY SERVICE RESOURCE

## ठाणे मंच रौप्य महोत्सवी वर्षाचा सोहळा-क्षणचित्रे



मान्यवरांतर्फे दीपप्रज्वलन




आपल्या बँकेच्या अध्यक्षा सौ. हिमांगी नाडकर्णी यांना
द. ना. नाडकर्णी यांच्यातर्फे स्मरण भेट



## ठाणे मंच रौप्य महोत्सवी वर्षाचा सोहळा-क्षणचित्रे



स्मरणिकेचे मान्यवरांतर्फे प्रकाशन



प्रमुख पाहुणे व कार्यकारिणीचे सभासद

## ठाणे मंच रौप्य महोत्सवी वर्षाचा सोहळा-क्षणचित्रे



सत्कार मूर्ती



कलाकार मंडळी



## शतकवीर श्रीमती ताराबाई पालेकर यांचा सत्कार



संघाचे कार्याध्यक्ष श्री. मारूती दळवी यांच्यातर्फे शाल



एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष डॉ. विवेक कुलकर्णी
यांच्यातर्फे स्मरणचिन्ह

# स्मरणिका 'ठाणे मंचा'ची
# एक परिशीलन - १

यंदा २० मार्च २०२२ रोजी आपल्या NKGSB संघाच्या ठाणे मंचाच्या स्थापनेचा रौप्यमहोत्सवी आनंद सोहळा दादर येथील राजा शिवाजी शाळेच्या आलिशान सभागृहात थाटामाटाने साजरा झाला. करोनाच्या तीन लाटांच्या विळख्यातून नुकतेच बाहेर पडलेले कारवारकर तब्बल २-२।। वर्षांच्या काळानंतर बऱ्याच बऱ्या-वाईट प्रसंगांना तोंड देऊन एकमेकांना भेटू शकले. त्यावेळच्या त्यांच्या भावनांचा आवेग पहाण्याचा हा हृद्य सोहळा म्हणूनही कायम लक्षात राहील. अशा या आनंदाच्या प्रसंगाच्या वर्णनाचे लेख मुखपत्रिकेत वाचायला मिळतीलच. मात्र त्याच दिवशी प्रकाशित झालेली वैशिष्ट्यपूर्ण स्मरणिका ही त्या दिवसाच्या अनेक आकर्षणांपैकी एक होती. तिच्याबद्दल सर्व मंडळींना उत्सुकता होतीच. त्यातलीच मी एक. स्मरणिकेचे प्रकाशन स्टेजवर होते न होते तोच खाली सभागृहात उपस्थित असलेल्या प्रत्येकाच्या हातात स्मरणिकेचा अंक तत्परतेने येऊन पोहोचला. अगदी सुबक आणि आटोपशीर असा.

घरी गेल्यावर निवांतपणे ही स्मरणिका नेहमीच्या सवयीप्रमाणे प्रथम चाळून पाहिली. सर्वात आधी मुखपृष्ठ पाहताच एकतर अर्थातच प्रस्तुत स्मरणिका ठाणे मंचाच्या रौप्यमहोत्सवानिमित्ताने काढल्यामुळे मध्यभागी दिलेली छायाचित्रे बोलकी आहेत. ठाणे मंचाने या २५ वर्षांच्या काळात चालविलेले सर्व उपक्रम एकाच ठिकाणी दाखवून देतात. ठाणे मंच म्हणजे काय हे मुखपृष्ठ पाहताक्षणीच उमजून येते.

मुखपृष्ठ उलटल्यावर कवळे मठाधीशांचे छायाचित्रासहित आशीर्वादाचे पत्र आणि आपले कुलदैवत श्री मंगेश आणि श्री शांतादुर्गा यांची देखणी जोड-चित्रे पाहून आपोआप हात जोडले जातात.

स्मरणिकेच्या शिरस्त्याप्रमाणे ज्येष्ठांच्या शुभेच्छा, अध्यक्षांचे मनोगत, ठाणे मंचाचे सर्वेसर्वा श्री. सुरेश पालेकर यांचे संपादकीय मनोगत, स्थापनेच्या वेळची मूळची कार्यकारिणी आणि विद्यमान कार्यकारिणी यांची छायाचित्ररूपाने ओळख करून दिली आहे. यातच लक्ष वेधून घेतो तो श्री. अरुण कसबेकर यांचा 'आदरणीय ज्ञातिबांधवाचा' सन्मान करणारा थोडक्यात पण भरीव शब्दात ओळख करून देणारा लेख.

यातले पहिले श्री. सुरेश पालेकर यांचा गौरव 'ठाणे मंचाचा पाया आणि कळस म्हणजेच श्री. सुरेश पालेकर' या शब्दात केला आहे. दुसरे म्हणजे आपले ज्ञातिप्रिय मुखपत्रिकाकार श्री. डी. एन्. नाडकर्णी. यांच्याबद्दल जे काही कौतुकाने लिहिले आहे ते किती मनोरंजक आणि खेळकर आहे ते स्वत: वाचल्यावाचून त्याची खुमारी कळणार नाही. त्यांचा उल्लेख 'झपाटलेला नाडकर्णी' हे खास बिरूद बहाल करून केला आहे. आणि तसेच तिसरे सन्माननीय व्यक्तिमत्व म्हणजे कारवारमध्ये हयात घालवलेले, मुंबईस्थित कारवारकरांना आपुलकीने आणि मायेने



मार्गदर्शन करणारे श्री. अरुण कुलकर्णी यांना 'असा हा अरुण कुलकर्णी कारवारच्या देवगडानंतर जीएस्बी लोकांचा दुसरा दीपस्तंभ आहे' अशा शब्दांत गौरविले आहे. या सर्वांचा थोडक्या शब्दांत इतका मोठा सन्मान म्हणजे श्री. कसबेकरांनी सर्व ज्ञातिबांधवांच्या वतीने व्यक्त केलेली कृतज्ञताच आहे.

श्री. सुरेश पालेकर ठाणे मंचाच्या स्थापनेपासून ते आजतागायत आपल्या सहकाऱ्यांना हाताशी धरून तितक्याच उमेदीने संस्थेचा कारभार यशस्वीपणे सांभाळत आहेत. त्यांची पत्नी सौ. सुरेखा ही नावापुरती सहधर्मचारिणी नसून तिने खऱ्या अर्थाने हा पत्नीधर्म अंगिकारलेला आहे. संस्थेच्या आजच्या भरभराटीला दोघांचेही अपार कष्ट आणि सुविहित नियोजन कारणीभूत झाले आहे. त्याबद्दल शंकाच नाही. या स्मरणिकेत विखुरलेले दोघांचे लेख म्हणजे त्यांचे मनोगतच आहे. ते एकामागोमाग एक असे वाचल्यास संघाच्या ठाणे मंचाच्या कार्यविस्ताराची पुरेपूर कल्पना येते. श्री.पालेकरांच्याच शब्दात ''हीरकमहोत्सवानंतर NKGSB संघाच्या वटवृक्षाला फुटलेली ठाणे मंच ही पारंबी आहे.'' त्यांनी गेल्या २५ वर्षांतल्या कार्याचा घेतलेला आढावा पाहून, ही पारंबी राहिली नसून ती संघाच्या वटवृक्षाचा आधारस्तंभ झाली आहे हे कळून येते.

ठाणे, डोंबिवली, कल्याण इत्यादी उपनगरातील ज्ञातिबांधवांच्या घरोघरी जाऊन सर्वांना एकत्र आणून सुरुवातीला वार्षिक स्नेहसंमेलन, हळदीकुंकू, अधूनमधून गायन, नृत्य, व्याख्याने इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रमांनी सुरुवात झाली. नंतर एक दिवसाची सहल. यात दादर-मुंबईकरही सामील होतात. सहलीसाठी तर तब्बल चार बसेस चार ठिकाणांहून सुटतात. हे सर्व मनोरंजनाचे कार्यक्रम करता करता समाजसेवा अधिक विस्तृत करण्यासाठी ज्ञातिभगिनींच्या मदतीने वधू-वर सूचक मंडळ स्थापन झाले आणि ते यशस्वीरीत्या चालू राहिले. आता तर काळाच्या मागणीनुसार डिजिटल स्वरूपात बदलल्यामुळे परदेशापर्यंतही त्याचा कार्यविस्तार झाला आहे. ही धुरा आता तरुणाईने सांभाळली आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी दोन दिवसांची सहल नेऊन तिथे ज्ञातीतल्या तज्ज्ञ डॉक्टरांना बोलावून त्यांची आरोग्य विषयक व्याख्याने आणि सल्ला हे सुद्धा या सहलीत साधले जाते. प्रस्तुत स्मरणिकेतली वेळोवेळची त्या त्या प्रसंगांची छायाचित्रे पाहून २५ वर्षांपूर्वीचे चेहरे आता वयोमानानुसार बदलत गेले तरी उत्साह आणि उमेद तितकीच टिकून राहिली आहे, हे दिसून येते. त्याचबरोबर हे सर्व उपक्रम किती निष्ठापूर्वक चालविले जातात याची कल्पना येते. एक आदर्श संस्था कशी असावी याचा वस्तुपाठच या स्मरणिकेने घालून दिला आहे. याचा उपयोग नव्याने या क्षेत्रात कार्य करू पाहणाऱ्या कुणालाही होऊ शकेल.

सौ. सुरेखा पालेकरांनी आपल्या 'ठाणे मंच-मागोवा' या लेखाच्या सुरुवातीलाच २०१९ सालच्या म्हणजे अलीकडच्याच कूर्ग-शिरशी-कारवारच्या सहलीच्या वेळी 'मत्स्यगंधा' गाडीच्या प्रवासात भेटलेल्या दोन अनोळखी सहप्रवासी सारस्वत भगिनींनी आपल्या सोबत

आणलेल्या 'कळ्याचेंडू'चे गजरे करून ते आपल्या सहप्रवासी भगिनींना वाटून, तसेच सोबत आणलेल्या खाद्य पदार्थांची आपापसात देवाणघेवाण करून कसे सर्वांचे हृदय जिंकून घेतले. हा प्रसंग आपल्या सारस्वत समाजाच्या अगत्यशीलतेचे नेमके वर्णन करतो आणि आपल्याला सुखावून जातो. मृदुला भांडारकर यांचा 'आस्वाद ठाणे मंचाचा'हा लेख मंचातल्या खेळीमेळीच्या वातावरणाचा बोलका साक्षीदार आहे.

त्याचप्रमाणे ठाणे मंचाचे प्रमुख अंग असलेल्या वधु-वर सूचक मंडळाची स्थापना आणि ते यशस्वीपणे चालवताना आलेले बरे-वाईट अनुभव, तसेच काळानुसार उतारवयात एकट्या पडलेल्या ज्येष्ठ नागरिकांना विशेषत: पुरुषांना जोडीदारणीची सोबत मिळवण्याची गरज कशी निर्माण झाली आहे, हे सहानुभूतिपूर्वक निर्देशित करणारे तारा गायतोंडे आणि वृंदा दिवेकर या मंडळाच्या ऊर्ध्वयू भगिनींचे लेख बरेच काही सांगून जातात. विचार करण्यास प्रवृत्त करतात.

आता याहून पुढे जाऊन संपादक श्री. सुरेश पालेकर यांनी केलेली महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या ज्ञाति बंधु-भगिनींना आपल्या हळव्या मर्मबंधातल्या ठेवीविषयी, अर्थात 'कारवार'विषयी आठवणी सांगण्यासाठी लिहिते केले. ही मातृभूमी म्हणजे कुणाची जन्मभूमी, तर कुणाचे आजोळ. आता काळानुसार म्हणा किंवा परिस्थितीनुसार म्हणा पूर्वीसारखे तिथे जाऊन मनमुराद राहता येत नसल्यामुळे 'गेले कोठे दिवस झुरतो आठवोनी तयांते' अशी अवस्था झालेल्या कारवारकरांना व्यक्त होण्याची संधी दिली आणि या सर्वांनी त्याला भरभरून प्रतिसाद दिला आहे.

स्मरणिकेच्या 'आम्ही कारवारकर' हा विभाग म्हणजे आपणा सर्व कारवारकरांच्या सांस्कृतिक जीवनाचा आरसा आहे. यातील प्रत्येक लेखात विशेषत: भगिनीवर्गाने लिहिलेल्या लेखात कारवारविषयीच्या हळव्या आठवणींची मालिकाच दिसून येते. कारवार म्हणजे 'साते बाजार', बाई कुंवरबाई मुलींची शाळा, हिंदू हायस्कूल, 'समुद्रा वेळ', सुरी पार्क कोडीबाग, सदाशिवगड, माजाळी, बिणगे घाट आणि बैतखोल हे ज्यांनी गेल्या सात-आठ दशकांपासून अनुभवले आहे, तो हाडाचा कारवारकर. पोटासाठी भटकत दूरदेशी मुंबईला पोहोचलेला. त्याला आपल्या बालपणाच्या, तरुणपणाच्या रम्य आठवणी आणि सौंदर्याने नटलेला 'गांव' कसा विसरता येईल? तो काळ, त्यावेळचे वातावरण, मोकळेपणा, एकमेकांविषयीची आपुलकी, आणि सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय म्हणजे 'नुस्त्ये' या सर्व गोष्टींनी आपला समाज बांधला गेला आहे.

कारवारमध्ये जन्म घेतलेले कारवारला घट्ट धरून घरातील वाडवडिलांनी चालू केलेले सर्व कुळाचार श्रद्धेने चालविणारे कारवारस्थित श्री. शांताराम (अरुण) कुलकर्णी यांचा 'कारवार काल आणि आज' हा लेख अनुभवाचे बोल सांगतो. गेल्या ७० वर्षांचा इतिहास तर सांगतोच शिवाय कानडीकरण, उद्योगधंदे, शिक्षणक्षेत्र, शहरीकरण यांचा समग्र इतिवृत्तांत सांगतो. सर्वांग परिपूर्ण असा लेख खरोखर वाचनीय आहे.



वरील लेख वाचण्याआधी या स्मरणिकेतला शेवटचा प्रा. मंगेश तेलंग यांचा पोर्तुगीजांनी केलेल्या धार्मिक अत्याचारामुळे मूळ गोव्यापासून स्थलांतरित होऊन कारवारच्या दिशेने कूच करीत कारवारच्या आसपासच्या गावात मिळेल तिथे स्थायिक झालेल्या सारस्वत कुटुंबांचा वृत्तांत सांगणारा Goa GSB to North Kanara GSB हा लेख कारवारांच्या आडनावांचीआणि त्यांनी वस्ती केलेल्या गावांची नांवे सांगतो. हा लेख वाचल्यावर नंतर त्याला जोडून श्री. अरुण कुलकर्णी यांचा वरील लेख वाचल्यावर याच विषयावर वाचलेली मन अस्वस्थ करणारी सारस्वत स्थलांतरितांवरची श्री. महाबळेश्वर सैल यांची 'तांडव' कादंबरी आठवते. वरील दोन्ही लेख एकमेकांना पूरक आहेत.

श्री. डी. एन्. नाडकर्णी यांच्या 'समुद्रा वेळे'वरून पुढे जाता जाता रवींद्रनाथ व त्यांचे न्यायाधीश बंधू यांच्यामुळे कारवारमध्ये त्यांचे वास्तव्य आणि सर्वात अद्भूत गोष्ट म्हणजे कद्रेकर नाडकर्णी कुटुंबाचा या बाबतीतला त्यावेळी जिल्हा न्यायाधीश असलेले श्री. सत्येंद्रनाथ टागोर यांच्याशी जमिनीच्या वारसाहक्काच्या कब्जावरून आलेला संबंध सांगून जातो आणि या इतिहासावरून पुढे वर्तमानात आल्यावर सत्येंद्रनाथांच्या पुढ्यात सादर झालेली आणि त्यांची स्वाक्षरी असलेली त्या काळातील मोडी लिपीतील कब्जासंबंधीची चोपडी आणि त्याबद्दलचे निकालपत्र हे ऐतिहासिक दस्तऐवज डी एन्. नाडकर्णी यांनी मोठ्या हिकमतीने कारवार कोर्टातून कसे मिळवले आणि आता ते त्यांच्या लॉकरमध्ये जपून ठेवले आहेत याची सुरस कथा वाचायला मिळते.

श्री. संतोष शामराव बोरकर (आपा बोरकरांचा नातू) यांचा 'हत्ती सावकार बोरकर' ही त्यांच्या पणजोबांवर लिहिलेली सत्यकथा आपल्याला अद्भूतरम्य विश्वात घेऊन जाते. हत्तीसारखे मुके प्राणी त्यांच्यावर केलेल्या उपकाराची परतफेड कशी भारंभार करतात याचे हे प्रत्यक्षात घडलेले उदाहरण आहे. या लेखासोबतचे त्याकाळचे दुर्मिख black & white फोटो आणि त्याखालील मजकूर स्वारस्यपूर्ण आहेत. आज संतोष बोरकर यांच्या वडिलोपार्जित राहत्या घरावर त्या हत्तींच्या गळ्यातल्या घंटा विराजमान आहेत, ते घरही या फोटोत पहायला मिळते.

श्री. अरुण कसबेकर यांचा 'मत्स्यगोत्री सारस्वत' हा खुसखुशीत लेख तर पु. ल. देशपांड्यांच्या शैलीत जास्त धमाल उडवून देतो. कारवारकरांच्या 'नुस्त्या'बद्दलच्या चोखंदळपणाचा दाखला देणारे विनोदी किस्से वाचताना हसू आवरत नाही. वधूपरीक्षेचा प्रसंग तर औरच! स्वत: वाचल्याशिवाय यातली गंमत कळणार नाही. लॉकडाऊनच्या काळात 'आज जेवणाक किते करू?' म्हणून विचारणाऱ्या घरकान्नीला लेखकाने दिलेला तोडगा म्हणजे कारवारकर अन्नपूर्णेच्या पुढ्यात असलेल्या रोजच्याच धर्मसंकटाची समस्यापूर्ती आहे. प्रस्तुत लेखासोबत दिलेले कारवारच्या 'मत्स्यमंदिरा'चे फोटो कारवारकरांचीच काय पण कुठल्याही मत्स्यप्रेमीची जीभ चाळवून जातील.

आपल्या सर्वच ज्ञातिभगिनींनी आपल्या लेखांतून स्त्रीसुलभ हळुवारपणे उलगडलेल्या कारवारविषयीच्या जुन्या आठवणी तर एकाहून एक सरस आहेत. मंगला कसबेकरांचा 'कारवारचा सातेबाजार', शीला बर्डे यांचा 'माझी कारवारची शाळा', नीना नाडकर्णी यांच्या 'सोनेरी गावातील सोनेरी आठवणी', हेमांगिनी कुलकर्णींचे 'ऋणानुबंध', सुवर्णा कुर्डेकर (वर्टी) यांचा 'माझे सदाशिवगड', गीता संझगिरींचा 'बदललेला कारवारी', सुषमा मुळगावकरांचा 'कारवारी खाद्यसंस्कृती' विद्या (माधुरी) वागळेंनी दिलेल्या आधुनिक प्रकारच्या पाककृती,

'कवडसे' या संकीर्ण विभागतले लता नायर यांचे 'सय-मनोगत', विद्या वागळे यांचा 'उपेक्षा वार्धक्याची' हे लेख हृद्य आहेत तसेच शीतल वागळे यांचा 'अशी ही नाती-गोती' तसेच डॉ. नंदिता पालेकर आणि डॉ. कल्पना दिवेकर या वैद्यकीय तज्ज्ञांचे माहितीपूर्ण लेखांचे योगदान हे सर्वच वैशिष्ट्यपूर्ण आहेत. देवदास नाडकर्णी यांचा 'सोशल मीडिया शाप की वरदान', अरुण रेगे यांचा दाखल्यांसहित 'जीवनाचे मर्म' उलगडून दाखवणारा लेख हे सर्व विविध साहित्य वाचताना आपण स्मरणिका वाचत आहोत की दर्जेदार दिवाळी अंक हे समजत नाही. ही अतिशयोक्ती वाटली तरी सत्याच्या जवळ जाणारी आहे.

अशी ही विविध अंगांनी नटलेली स्मरणिका म्हणजे केवळ संस्थेच्या वाटचालीचा वृत्तांत नसून संग्रहणीय असा सांस्कृतिक ठेवा आहे.

– **शैलजा मं. नाडकर्णी,** शिवाजी पार्क ९८२०१७९३८५

## विवाह /वाङ्‌निश्चय

| | | |
|---|---|---|
| **कोनार्क(चिराग) अनन्त बोरकर, माहीम** | व | **अंकिता विजयानंद जुवळे, ठाणे** |
| **रिया रोहित कामत, कांदीवली** | व | **अमेय संजय मुळे, वडोदरा** |

## ☺ ☺ ☺ विजूले चुटकुले ☺ ☺ ☺

नागेशाक मोबायलाचेर तागेल्या बँक खात्यार दीड हजार जमा जाल्यात अस्सो मेसेज येता. तो बायलेक विचारता हे रुपै कशे जमा जाले ते कळना. बायल म्हणता हांवेच याल्यात ते. एप्रिल महिन्याच्या लॉकडाऊनातलो पगार. नागेश गौजी यालता, तूं कामवालेक तीन हजार दिताली मागीर माका दीडच हजार? बायल वदरता, कामवालेक पगारच दिताले, जेवूक खावूक न्हंय. तुका दोनी वेळचे जेवण आणि नाश्ता ताजे पैशे हार्वे कापून घेतला.

कमळी घोवाक : तुमी खूप भोळे. तुमका कोणीही फसवू शकता.
घोव : हंय बरोबर. तुज बरोबर लग्न केले नंतर माका बी ध्यानात आयले.

–विजय सदानंद वागळे, ठाणे–९२२१६०७५७७



# स्मरणिका 'ठाणे मंचाची'
# एक परिशीलन - २

नुकताच संघाच्या 'ठाणे मंच'चा 'रौप्य वर्षी महोत्सव' अपार उत्साहात साजरा झाला. भविष्यातील दमदार वाटचालीमधील हे 'पहिले पाऊल' म्हणता येईल! उत्सवाच्या आनंद–सोहळ्यात 'स्मरणिके'चे प्रकाशन झाले. त्या 'स्मरणिके'चाच अल्पसा परामर्श घेण्याचा हा प्रयत्न!

नृत्य–संगीताबरोबरच कै. 'मनोरमा वागळे' या प्रसिद्ध अभिनेत्रीची 'मुलाखत' व क्रीडा–समीक्षक 'मिलींद वागळे' यांचा 'प्रश्नमंच' या रंगतदार कार्यक्रमाने शुभारंभ केल्यानंतर पंचवीस वर्षांच्या काळात मंचाने 'बहुजनहिताय, बहुजनसुखाय' जे उपक्रम सुरू केले, त्यांची ओळख करून देणारे मुखपृष्ठ अंतरंगाबद्दल निश्चितच उत्सुकता निर्माण करते.

'वधू–वर परिचय, सहलींचे आयोजन, मनोरंजनात्मक कार्यक्रम, भगिनींचे हळदीकुंकवासारखे समारंभ या सर्व विधायक प्रसंगांची झलक पाहता पाहता पान उघडले जाते! 'कवळेमठाच्या' स्वामींचे आशीर्वाद आणि 'श्री मंगेश–शांतादुर्गे'च्या आश्वासक दर्शनाने मन भारावून गेल्यावाचून राहूच शकत नाही!

'रौप्य महोत्सवी स्मरणिका' असल्यामुळे अर्थातच पंचवीस वर्षांच्या कार्यकालात मंचाकडून कोणकोणते उपक्रम राबविले गेले त्याचे तपशीलवार वर्णन वाचून अपरिचितालाही मंचाच्या कार्यबाहुल्याचे कौतुकच वाटेल! अर्थात 'कार्य' म्हटले की कार्यकर्ते हवेत, हे ओघानेच आले! कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेत, सारे सभासद जिवाचे रान करीत विविध जबाबदाऱ्या पार पाडीत मंचाला यशाच्या मार्गावर नेताना दिसतात!

'आम्ही कारवारकर' हा आपल्या जवळिकीचा विषय होऊन त्यावर लिहिलेले विविधांगी लेख वाचताना आपल्या प्रिय कारवारचे विविध पैलू हृदयाला भिडतात! आपल्या आवडत्या कारवारवर निसर्गानेही तितक्याच प्रेमाने केलेली सौंदर्याची उधळण हा कुणाच्या लेखाचा विषय बनला आहे, आणि कारवारची 'समुद्रावेळ', तिच्याशी निगडित असलेली 'रवींद्रनाथां'ची भावना, सत्येंद्रनाथ टागोर आणि कद्रेकर नाडकर्णी लोकांचे जुळलेले स्नेहबंध, तसेच कारवारबद्दलचे कै. 'पुलं'चे हृदयंगम बोल हे सांगणारे सारे लेख अक्षरशः भारावून टाकतात! ''मागे वळून पाहताना'' हा लेख 'ठाणे मंच'च्या १९९६ ते २०२२ या कालावधीतील घटनांची तपशीलवार मालिकाच डोळ्यांसमोर ठेवतो.

मंचाने करमणूक, सहली वगैरेंच्या जोडीनेच ज्ञातिबांधवांच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्याचाही विचार करून 'आमगेले डॉक्टर्स, आमगेल्या वासपुशीक' किंवा 'मानसशास्त्रज्ञांबरोबर विचारविनिमय' असे नितांत आवश्यकतेचे कार्यक्रमही केले. 'नाक–कान–घशा'च्या ज्येष्ठ नागरिकांच्या समस्येबद्दलची, तसेच 'ॲनास्थेशिया' यासंबंधीची माहिती देण्याचे मोलाचे कार्य केले!

ज्ञातीतील थोर व्यक्तींच्या उदात्त चरित्राची ओळख करून देण्याच्या हेतूने 'कै. देवीदास पालेकर', 'कै. अनंत कसबेकर' यांच्या कार्याविषयी लिहिलेले लेख निश्चितपणे मार्गदर्शक ठरतील, असे आहेत. 'हत्ती सावकार' यांचीही ओळख आहे.

सरस्वती नदीच्या काठावरील आपल्या पूर्वजांचे ठिकठिकाणी स्थलांतर होत आपण 'एन्. के. जी. एस्. बी.' कसे झालो, तो इतिहास सांगणारा लेख खूप रंजक वाटतो!

कारवारचा 'सातेबाजार आणि मासे' हा विषय आला नाही, तर कारवारची ओळख अपूर्णच राहील, नाही का? 'विष्णू'च्या या अवतारावर आपण मत्स्यप्रेमी ज्ञातिबांधव इतके प्रेम करतो, तितके स्वत:वरही करीत नसू'', असा एक विचार मत्स्यप्रेमावरील लेख वाचताना मनात येऊन गेला!

कारवारमधील नामांकित विद्यालये आणि त्यातील आदर्श शिक्षक यांच्याबद्दल आदर व्यक्त करणाऱ्या लेखाने खरोखर समाधान वाटते, कारण आपण हाडाचे शिक्षणप्रेमी! आनंददायी जत्रांचे वर्णनही त्या वातावरणात घेऊन जाते!

कारवारचे हे सारे कौतुक वाचून मन भरून आलेले असतानाच आणि जुन्या जमान्यातील तेथील अनुकरणीय गोष्टींबद्दल आत्मीयता अनुभव असतानाच आधुनिक काळातील बदललेल्या गोष्टी, बदललेला मानवी स्वभाव या विषयी खंत व्यक्त करणारा लेख पुढे येतो व 'फॅमिली डॉक्टर' ही पूर्वीची संकल्पना व तिच्याशी संलग्न असलेली नि:स्वार्थी वृत्ती आज लोप पावली आहे, हे व्यक्त करतो. पूर्वी येथे महत्त्वाचा असलेला शेती व्यवसाय ठप्प झाला आहे आणि दुर्दैव असे की, बिणगा येथील 'कॉस्टिक सोडा फॅक्टरी'चा अपवाद वगळता कोणताही उद्योग येथे स्थिरावलेला नाही. परिणामत: तरुण पिढी इतर शहरात किंवा परदेशी धाव घेत आहे! एक गरजेची गोष्ट म्हणजे मुंबईहून कारवारला येण्यास अत्यंत सोयीची असलेली सागरी वाहतूकही उपलब्ध नाही, असे नाना प्रकारचे शल्य आपल्या जिर्वीच्या जिव्हाळ्याला–कारवारला–बोचत असल्याचे जाणवते. मराठी भाषेची झालेली पीछेहाटही मनाला चटका लावून जाते!

अशा या स्मरणिकेत 'सोशल मीडिया', 'जीवनाचे मर्म', 'उपेक्षा वार्धक्या'ची, 'अशी ही नातीगोती' अशा विषयांचा अंतर्भाव झाल्याने वैविध्य आले आहे. 'दुसऱ्याची खिल्ली उडविणारा (कुचिंद्री)' कारवारकर, 'राखावी बहुतांचि अंतरे' म्हणत 'ममता–संस्कृती'ही जपतो, हे दाखविणारे लेखही येथे भेटतात तर 'मॉडेल हाऊस'चे वर्णन मनाला भावते! शेवटी 'फ्रूटफज्', 'स्पाँजी बॉल' हे स्मरणिकेची मधुरता वाढविण्याचे काम करतात आणि प्रसंगोचित फोटो तिचे सौंदर्य वाढवितात!

थोडक्यात सांगायचे तर ही केवळ एक स्मरणिका न राहता एक उत्कृष्ट 'संदर्भ–पुस्तिका' झाली आहे, असे म्हणता येईल!


**– नीलिमा शशिकांत नाडकर्णी,** माहीम –९१६७७४५६२८





kunalconstructiongoa@yahoo.in GOA RERA NO: PRGO05180314

## पेशी विज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. उल्हास वाघ यांचे निधन




कारवार येथील गेल्या पिढीतील एक लोकप्रिय **डॉक्टर वामन वाघ (पंडितकाका)** यांचे सुपुत्र व सीरम विषयांतील तज्ज्ञ डॉ. उल्हास वाघ यांचे अलीकडेच पुणे येथे निधन झाले. त्यांच्या निधनाचे वृत्त स्थानिक वर्तमानपत्रात फोटोसह प्रसिद्ध झाले होते. यावरून त्यांची महती समजते. राष्ट्रीय पेशी विज्ञान केंद्राचे (एनसीसीएस्) संस्थापक व संचालक म्हणून त्यांनी काम केले होते. ऐंशीच्या दशकांत भारतात आधुनिक जैवसंशोधनाचा पाया रचणाऱ्या शास्त्रज्ञांपैकी ते एक होते.

डॉ. वाघ यांनी मुंबई विद्यापीठातून पीएचडी केल्यावर स्वीडन येथील कॅरोलिस्का इन्स्टिट्यूट येथे संशोधन पूर्ण केले. भारतात परतल्यावर त्यांनी मुंबईतील 'कॅन्सर रिसर्च इन्स्टिट्यूट' येथे संशोधन सुरू केले. १९७० ते ८५ या काळात ते राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेत वरिष्ठ शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत होते.

जैव संशोधनासाठी आवश्यक पेशी आणि उतींचे संकलन आणि संवर्धन करणाऱ्या राष्ट्रीय प्रकल्पाची डॉ. वाघ यांनी सर्वप्रथम १९८६ मध्ये मांडणी केली. त्यातूनच तत्कालीन पुणे विद्यापीठाच्या आवारात १९८८ मध्ये 'एनसीसीएस'ची स्थापना झाली. 'एनसीसीएस'मधून निवृत्त झाल्यावर डॉ. वाघ यांनी भारती विद्यापीठाच्या 'इंटरॲक्टिव्ह रिसर्च स्कूल फॉर हेल्थ अफेअर्स'चे (इर्षा) २००१ ते २००६ या काळात पहिले संचालक म्हणून काम पाहिले. सूक्ष्मजीव, मानवी आरोग्यावर परिणाम करणारे जंतू, सेल लाइन यांच्यापासून ते औषध तपासणीपर्यंत त्यांच्या संशोधनाचा आवाका होता. अनेक आंतरराष्ट्रीय जर्नलमधून त्यांचे संशोधन प्रसिद्ध झाले होते. डॉ. वाघ यांच्या नावावर आंतरराष्ट्रीय पेटंटही होते.





**श्री पंढरीनाथ (सुरेश) वामन वागळे**

**बाड, कारवार**

**जन्म ९ जुलै १९३८ देवाज्ञा २८ जानेवारी २०२२**

*तुम्ही आमच्यात नाहीत हे मनाला पटत नाही*

*तुमची आठवण सतत येत असते*

*तुमच्या आत्म्याला शांती लाभो*

*हीच ईश्वरचरणी प्रार्थना*

**श्रीमती सुवर्णा, सौ. शैलजा, श्री. राजेश, माधवी, मानसी**

## निधन

| | | |
|---|---|---|
| वसंत शांताराम भेडसगांवकर | (शिरसी) | जोगेश्वरी |
| ललिता महाबळेश्वर दिवेकर | (कणसगिरी) | अंकोला |
| किशोरी शरद गायतोंडे | (कडवाड) | शिवाजी पार्क |
| अनसूया गजानन गायतोंडे | (हळगे) | माहीम |
| कमल (अम्बू) मोहन कसबेकर | (कडवाड) | मालाड |
| गजानन महाबळेश्वर कसबेकर | (कडवाड) | घाटकोपर |
| शैला अरविन्द कामत (पूर्वाश्रमीच्या यमुना सुबराव दिवेकर) | (कणसगिरी) | अंधेरी |
| दीपा दीपक खानोलकर (पूर्वाश्रमीच्या मीना श्रीपाद ब्रह्मे) | (सदाशिवगड) | वांद्रे |
| दीपक भवानी कुलकर्णी | (उळगे) | मालाड |
| रामदास गोविन्द कुलकर्णी | (हळगे) | सांताक्रुज |
| सच्चिदानंद यशवंत कुलकर्णी | (चेंडिये) | ठाणे |
| दिनकर दुर्गाराम कुलकर्णी | (हळगे) | ठाणे |
| श्रीपाद शंकर नाडकर्णी | (सांवरपै) | पारले |
| दत्तात्रय (देवीदास) रामचंद्र नाडकर्णी | (अंकोला) | डोंबिवली |
| जयश्री दीपक नाडकर्णी | (अंकोला) | भोपाळ |
| शंकर नीळकंठ नेत्रावळी | (अंकोला) | पारले |
| इंदिरा (पोरी) देवराव पिकळे | (अंकोला) | अंधेरी |
| सुरेखा गुरुदास राजाध्यक्ष | (कारवार) | माहीम |
| मोहन शामराव सुखटणकर | (हारवाडे) | वाशी |
| शीला मोहन सुखटणकर | (हारवाडे) | वाशी |
| सुचेता दीपक तेलंग | (केरवडी) | जोगेश्वरी |
| सुरेन्द्र विश्वनाथ तेलंग | (बाड) | अंधेरी |
| उल्हास वामन वाघ | (सदाशिवगड) | पुणे |
| ऊर्मिला उल्हास वाघ | (सदाशिवगड) | पुणे |
| सुलोचना रमेश वाघ | (सदाशिवगड) | पुणे |
| जगदीश (बाबू) गुणेश्वर वागळे | (माजाळी) | मालाड |
| पंढरीनाथ (सुरेश) वामन वागळे | (बाड) | गोरेगांव |
| रेखा (शांता) दिलीप वागळे | (बाड) | गोवा |
| गुलाब श्रीपाद वागळे | (बाड) | अमेरिका |
| जयश्री शिवानंद वागळे | (माजाळी) | हुबळी |
| अंजली विश्वास वर्टी | (सदाशिवगड) | अलीबाग |



## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या (मागील अंकानंतर) उल्लेखनीय देणग्या

### सौ. मंगला (प्रभा) व श्री. अरुण भास्कर कसबेकर यांच्यातर्फे एक कोटी एक लाख रुपयांची देणगी

आपल्या ज्ञातीचे एक निस्सीम हितचिंतक श्री. अरुण भास्कर कसबेकर गेली १५ वर्षे सातत्याने संघाला भरघोस देणग्या देतात हे आता सर्वांना माहितच आहे. अलीकडेच त्यांनी आपल्या पत्नी सौ. मंगला (प्रभा) यांच्यासह आणखी एक कोटी व एक लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्यांच्या मते सर्व खारगे, कडवाड, शिद्दर आणि इतर कसबेकर मंडळी ज्यांना संघाला देणग्या देण्याची मनोमन इच्छा होती पण ती इच्छा काही कारणास्तव पूर्ण होऊ शकली नाही त्या सर्व कसबेकर बांधवांच्या इच्छेच्या काही अंशांची तरी पूर्तता करण्याचा सौ. व श्री. कसबेकर यांचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. त्यांच्या मते केवळ पूज्य शांताईंच्या आशीर्वादानेच ते आपले मुच्युअल फंड वगैरे मिळून आलेल्या एक कोटी दहा लाखांपैकी एक कोटी एक लाख रुपये देणगी म्हणून देण्याचे मन:सामर्थ्य त्यांना लाभू शकले. या रकमेपैकी ५१ लाख रुपये वृद्ध सेवानिधीसाठी आहेत व २५ लाख रुपये प्रत्येकी वैद्यकीय सेवा निधी व एज्युकेशन सोसायटी यांच्यासाठी आहेत.

**विविध प्रसंगी श्री. कसबेकर यांनी दिलेली ही २४ वी देणगी असून त्या सर्व देणग्यांची एकूण रक्कम १ कोटी ६९ लाख व ५० हजार रुपये एवढी आहे.**

### कु. यमुना व कु. विमल यशवंत बोरकर यांच्या स्मृती प्रीत्यर्थ वृद्धसेवानिधीसाठी पाच लाख रुपयांची देणगी

पूर्वी गिरगांव येथे कु. यमुना व कु. विमल यशवंत बोरकर या कुटुंबवत्सल बहिणी वास्तव्याला होत्या त्यांच्या सालस स्वभावाची महती सांगणारे लेख मागे मुखपत्रिकेत प्रसिध्दही झाले होते, उभयतांच्या स्मरणार्थ त्यांच्या जवळच्या नातेवाईकांनी नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर वृद्धसेवानिधीसाठी पाच लाख रुपयांची देणगी दिली आहे.

### डॉ. शांता वि. तेलंग यांच्या स्मरणार्थ दोन लाख रुपयांची देणगी

पूर्वी अंधेरी येथे राहणाऱ्या गणित विषयाच्या प्राध्यापिका डॉ. शांता विश्वनाथ तेलंग यांचे तीन वर्षांपूर्वी दु:खद निधन झाले होते. त्यांच्या स्मरणार्थ त्यांचे बंधू श्री. विजय वि. तेलंग यांनी वृद्धसेवानिधीसाठी व एज्युकेशन सोसायटीसाठी प्रत्येकी एक लाख याप्रमाणे एकूण दोन लाख रुपयांची देणगी दिली आहे.

**श्री. शरद सलगर यांच्या स्मरणार्थ यंदाही**

**१ लाख ५३ हजार ३ रुपयांची देणगी**

सदाशिवगड माध्यमिक शाळेचे लोकप्रिय मुख्याध्यापक सलगर मास्तर यांचे चिरंजीव व टान्झानिया येथे ३५ वर्षे वास्तव्य करून नावलौकिकास आलेले श्री. शरद सलगर यांचे दहा वर्षांपूर्वी दु:खद निधन झाले होते. त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रेखा सलगर प्रतिवर्षी पतीच्या स्मरणार्थ समाजसेवा निधीसाठी, वृद्धसेवानिधीसाठी व एज्युकेशन सोसायटीसाठी प्रत्येकी रु. ५१००१ याप्रमाणे एकूण १,५३००३ रुपयांच्या देणग्या देतात. यंदाही त्यांनी अशाच देणग्या दिल्या आहेत.

**श्रीमती शकुंतला म. वाघ यांच्या स्मरणार्थ**

**एक लाख एकशे एक रुपयांची देणगी**

पूर्वी फ्रेंच ब्रीज जवळ राहणाऱ्या, श्रीमती शकुंतला मधुकर वाघ यांचे दोन वर्षांपूर्वी दु:खद निधन झाले. त्यांच्या द्वितीय पुण्यतिथी प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ बंधू श्री अविनाश मधुकर वाघ यांनी वृद्धसेवानिधीसाठी एक लाख एकशे एक रुपयांची देणगी दिली आहे.

**श्री. सुरेश कैसरे यांच्यातर्फे एज्युकेशन सोसायटीला**

**एक लाख रुपयांची देणगी**

कोल्हापूर येथे वास्तव्याला असणारे श्री. सुरेश कैसरे यांनी आपले आई वडील श्रीमती रमाबाई व श्री. वासुदेव नारायण कैसरे यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

**श्रीमती ऊर्मिला व श्री. मंगेश पु. नाडकर्णी यांच्या**

**स्मरणार्थ एक लाख रुपयांची देणगी**

पूर्वी बोरीवली (पू.) येथे वास्तव्याला असणारे श्रीमती ऊर्मिला व श्री. मंगेश पुरुषोत्तम नाडकर्णी या उभयतांचे सुमारे ४० वर्षांपूर्वी निधन झाले होते. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांचे सुपुत्र श्री. सुधीर व स्नुषा श्रीमती सुनीता यांनी वृद्धसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

**श्री शंकर नेत्रावळी यांच्या स्मरणार्थ**

**एक लाख एक रुपयांची देणगी**

पारले येथे वास्तव्याला असणारे श्री. शंकर नीलकंठ नेत्रावळी यांना २ फेब्रुवारी २०२० रोजी शंभर वर्षे झाली, तेव्हा त्यांचा सत्कार करण्यात आला होता. तेव्हा आपल्या संघातर्फे व एज्युकेशन सोसायटीतर्फे त्यांचा सन्मान करून त्यांच्याकडून शुभाशीर्वाद घेण्यात आले होते व त्याचा वृत्तांत मुखपत्रिकेतून देण्यात आला होता. अलीकडेच २७ जानेवारी रोजी १०२ व्या वर्षी



त्यांचे देहावसान झाले. त्यांच्या स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र श्री. गुरुनाथ यांनी एज्युकेशन सोसायटीला एक लाख एक रुपयांची देणगी दिली आहे.

**श्रीमती ताराबाई पालेकर यांच्या जन्मशताब्दी सोहळ्या**

**प्रसंगी कुटुंबीयांकडून पन्नास हजार रुपयांची देणगी**

वर उल्लेखिलेल्या शतकवीर शंकरबाब नेत्रावळी यांच्या कनिष्ठ भगिनी श्रीमती ताराबाई पालेकर यांनीही शंभर वर्षे पूर्ण केली. २० मार्च २०२२ हा त्यांचा जन्मशताब्दी दिवस. त्या सोहळ्याप्रसंगी त्यांच्या कुटुंबीयांनी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे. त्यांतील पंचवीस हजार रुपये प्रत्येकी वृद्धसेवानिधीसाठी व एज्युकेशन सोसायटीसाठी आहेत.

**श्रीमती सुंदर व श्री. गोपाळ (नागा) बोरकर यांच्या स्मरणार्थ**

**६५ हजार रुपयांची देणगी**

पूर्वी वांद्रे (पू.) येथे राहणारे श्रीमती सुंदर व श्री. गोपाळ शामराव बोरकर यांच्या स्मरणार्थ त्यांची कन्या श्रीमती पद्मजा व जामात श्री. गिरीश महाबळेश्वर शानभाग यांनी एज्युकेशन सोसायटीला ६५ हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**–चुकीची दुरुस्ती –**

श्री. विश्वनाथ तेलंग : गेल्या मुखपत्रिकेच्या अंकात पृ. २४ वर उल्लेखनीय देणग्यांच्या संदर्भात 'श्री. मलप्पा तेलंग' असा उल्लेख आला होता. तो 'विश्वनाथ तेलंग' असा हवा. चुकीबद्दल क्षमस्व.

**संघास मिळालेल्या देणग्या**

| | | |
|---|---|---|
| १. | पितरांच्या स्मरणार्थ पितृपक्षानिमित्त<br>श्रीमती रेखा धुमे यांजकडून | २००० |
| २. | पितरांच्या स्मरणार्थ भांडारकर कुटुंबीयांकडून | २५०१ |
| ३. | पितरांच्या स्मरणार्थ नाडकर्णी कुटुंबीयांकडून | २००१ |
| ४. | श्री. रामदास काशिनाथ नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ<br>पत्नी श्रीमती सिंधू यांजकडून | १५०१ |
| ५. | श्री. देवीदास शांताराम कसबेकर व<br>श्रीमती शालिनी मनोहर नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ व<br>श्री. डी. एन्. नाडकर्णी यांच्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त हितचिंतकाकडून | ३००३ |
| ६. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या ८९ व्या<br>वाढदिवसाच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून | १००१ |
| ७. | श्रीमती वृंदा व श्री. गजानन वासुदेव कसबेकर यांच्या स्मरणार्थ<br>भाचे सर्वश्री आनंद व दिलीप गणपत आरस यांजकडून हळदीकुंकू समारंभासाठी | २००० |

| | | |
|---|---|---|
| ८. | श्री शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१००१ |
| ९. | श्री. कमलाकर यशवंत तेलंग यांच्या चौथ्या पुण्वतिथी प्रसंगी पत्नी श्रीमती सुरेखा (सुमन) यांजकडून | ५००० |
| १०. | श्री. सच्चिदानंद नागेश नाडकर्णी यांच्या २६ व्या पुण्यतिथी निमित्त नाती कु. सुदिप्ता व अनुष्का सुबोध नाडकर्णी यांजकडून | ५००० |
| ११. | नाडकर्णी कुटुंबीयांकडून खालील व्यक्तींच्या स्मरणार्थ | |
| | श्रीमती गंगाबाई काशिनाथ नाडकर्णी | २५०१ |
| | श्री. काशिनाथ त्रिंबक नाडकर्णी | २५०१ |
| १२. | केरवडी दिवेकर कुटुंबीयांतर्फे | १,५६,६१० |

**वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. जिवबा नागेश सरदेसाई यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती आशा जिवबा सरदेसाई यांजकडून | २५००० |
| २. | श्री. वासुदेव जनार्दन कामत यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती शांता कामत यांजकडून | २५००० |
| ३. | श्री. माधव नायक यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती माया नायक यांजकडून | २००० |
| ४. | श्री. गोविंद मारुती कसबेकर यांच्या ११ व्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. विनय यांजकडून | ३००० |
| ५. | श्री. शरदकुमार शंकरराव वागळे यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती शीतल वागळे राव यांच्याकडून | १०००० |
| ६. | सौ. मंगला व श्री. अरुण भास्कर कसबेकर यांजकडून समस्त कसबेकर परिवारातर्फे | २५००००० |

**वृद्धसेवानिधीसाठी**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री दत्तात्रय भवानी कसबेकर यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त बंधू सर्वश्री नारायण व रमाकांत कसबेकर यांजकडून | ५०००० |
| २. | श्रीमती ऊर्मिला व श्री. मंगेश पुरुषोत्तम नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ स्नुषा सुनीता व पुत्र सुधीर नाडकर्णी यांजकडून | १००००० |
| ३. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा सलगर यांजकडून | ५१००१ |
| ४. | श्रीमती हेमा व श्री. मोहन आनंदराव नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. आनंद यांजकडून | २५००० |



| | | |
|---|---|---|
| ५. | श्री. रघुवीर विश्वनाथ वागळे यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने पुत्र सर्वश्री दीपक व राज वागळे यांजकडून | २५००० |
| ६. | डॉ. शांता विश्वनाथ तेलंग यांच्या स्मरणार्थ बंधू श्री. विजय तेलंग यांजकडून | १००००० |
| ७. | श्रीमती विमल व श्री. गजानन सीताराम बोरकर यांच्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. सीताराम व श्री. दीपक बोरकर यांजकडून | १०००० |
| ८. | श्रीमती शकुंतला मधुकर वाघ यांच्या दुसऱ्या पुण्यतिथीनिमित्त बंधू श्री. अविनाश मधुकर वाघ यांजकडून | १००१०१ |
| ९. | कुमारी यमुना व विमल यशवंत बोरकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतकाकडून | ५००००० |
| १०. | श्री. यशवंत जी. वागळे (बाबूमामा) यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त भाची कुमारी मेधा मुझुमदार व श्रीमती शैलजा बोरकर यांच्याकडून | १०००१ |
| ११. | श्रीमती सरलाबाई व श्री. भालचंद्र वि. कुलकर्णी व श्री. सुब्राव वि. कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र व पुतणे सर्वश्री प्रमोद, सुभाष आणि सुधीर यांजकडून | १५००० |
| १२. | श्रीमती ताराबाई भालचंद्र पालेकर यांच्या शताब्दी वाढदिवसानिमित्त कुटुंबीयांकडून | २५००० |
| १३. | सौ. मंगला (प्रभा) व श्री. अरुण भास्कर कसबेकर यांजकडून समस्त कसबेकर परिवारातर्फे | ५१००००० |

**एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या ८९ व्या वाढदिवसाच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून | १००१ |
| २. | श्रीमती रमाबाई व श्री. वासुदेव नारायण कैसरे यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. सुरेश यांजकडून | १००००० |
| ३. | श्रीमती हेमा व श्री. मोहन आनंदराव नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. आनंद नाडकर्णी यांजकडून | २१००० |
| ४. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ श्रीमती रेखा सलगर यांजकडून | ५१००१ |
| ५. | डॉ. शांता विश्वनाथ तेलंग यांच्या स्मरणार्थ बंधू श्री. विजय तेलंग यांजकडून | १००००० |
| ६. | श्रीमती सुंदर व श्री. गोपाळ शामराव बोरकर यांच्या स्मरणार्थ कन्या पद्मजा व जामात गिरीश शानभाग यांजकडून | ६५००० |

| | | |
|---|---|---|
| ७. | श्री. शंकर नीलकंठ नेत्रावळी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. गुरुनाथ यांजकडून | १०००० |
| ८. | श्रीमती वृंदा व श्री. गजानन वासुदेव कसबेकर यांच्या स्मरणार्थ भाचे सर्वश्री आनंद व दिलीप गणपत आरस यांजकडून | ८००० |
| ९. | श्रीमती ताराबाई भालचंद्र पालेकर यांच्या शताब्दी वाढदिवसानिमित्त कुटुंबीयांकडून | २५००० |
| १०. | श्री. शरदकुमार शंकरराव वागळे यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती शीतल वागळे राव यांजकडून | १०००० |
| ११. | श्रीमती बन्सी धनंजय जोशी यांजकडून | २५००० |
| १२. | सौ. मंगला (प्रभा) व श्री. अरुण भास्कर कसबेकर यांजकडून समस्त कसबेकर परिवारातर्फे | २५००००० |

**ठाणे मंच, देणगीदारांची यादी**

| | | |
|---|---|---|
| १. | एन्केजीएस्बी बँक | १००००० |
| २. | सुप्रिया लाईफ सायन्स लि. | ४०००० |
| ३. | डॉ. शांत वि. तेलंग यांच्या स्मरणार्थ बंधू श्री. विजय तेलंग यांजकडून | १०००० |
| ४. | श्री. उमाकांत काशिनाथ पालेकर, जोगेश्वरी | २००० |
| ५. | श्री विजय सदानंद वागळे, ठाणे | १५०० |


**SHREE HOMOEPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**

**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane,
Matunga (West), Mumbai - 400 016. Mob. : 83560 24542 / 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) ,**
**Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**




Regd. with register of Newspapers of India under Reg. No. RN37436/80


**NKGSB Bank**
NKGSB Co-op. Bank Ltd.
(Multi-State Scheduled Bank)
Trusted over a Century

**Multiple Rewardz in One Fixed Deposit**



w.e.f. 19.04.2021

| | From 1 - 2 yrs | Above 2 - 5 yrs | Above 5 - 10 yrs |
|---|---|---|---|
| General Public | 5.60% p.a. | 5.75% p.a. | 5.85% p.a. |
| Senior Citizen | 5.85% p.a. | 6.00% p.a. | 6.35% p.a. |

- Higher Interest for Longer Period
- Choice of Monthly (Discounted) / Quarterly / Maturity Interest Payout
- Higher Yield over Card Rate on Interest Reinvestment Plan
- Instant Liquidity in case of urgency
- Convenient booking through our Quick Mobil App / Net Banking
- Avail Exciting Offers on FD / RD creation via Quick Mobil App
- Auto-Sweep facility available in multiples of INR 1000

T&C Apply.

Rates are applicable for Fixed Deposits in India only.

www.nkgsb-bank.com
Call us: 022 28602000


हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.